# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा

‘अर्थ’बोध करून देणारे मासिक

INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY LIBRARY
7/10/05

३ • स्वागत

५ • परीक्षापद्धती कशी सुरू झाली?

९ • शेतीचे नवतंत्र शेतकऱ्यांना शिकविते तरी कोण?

१४ • आर्थिक सुधारणांच्या संतुलित वाटचालीसाठी...

२० • विस्तारलेले अवकाश आणि....

२४ • हानिकारक सौंदर्यप्रसाधने

२९ • हवे सबलीकरण विद्यापीठीय शिक्षणाचे

३३ • जिकडे-तिकडे :-
काळा (की कार्बन?) पैसा

३६ • ‘काल’चे ‘आज’साठी
(‘तुतारिने द्या सावध व्हा तर..’)

खंड ४ : अंक ७ ऑक्टोबर २००५

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**वार्षिक वर्गणी १००/- रुपये**
**(परदेशस्थ वाचकांसाठी $२०)**
वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

---


**वर्गणीसाठी पत्ता :**
व्यवस्थापक,
**अर्थबोधपत्रिका,**
**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध,
९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग,
(रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.
फोन : २५६५७१३२
: २५६५७२१०
फॅक्स : २५६५७६९७
ई-मेल : ispe@vsnl.com


---


**अर्थबोधपत्रिका**
**खंड ४ (अंक ७) ऑक्टोबर २००५**
**संपादक - अभय टिळक**
**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**

◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, अशी आपणास विनंती आहे.

## 'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी?

**जी सहज चाळता येईल अशी !**

◆भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेचे 'अर्थबोधपत्रिका' हे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेखन देणारे प्रकाशन **वर्गणीदारांना दरमहा १० तारखेला पोस्टाने पाठविले जाते.** ◆मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे आणि एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे व सोप्या शब्दांत देणे, हे या मासिकाचे उद्दिष्ट. ◆अनेक विषयांवरील सखोल माहिती व विश्लेषणात्मक लेख प्रसिद्ध करणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके, पुस्तके व इंटरनेटसारखी माध्यमे आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी माहिती मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा हा प्रयत्न. ◆ अंकातील लेख आपण आपल्या नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. ◆लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.

> जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे किती तरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.

# स्वागत

बरोबर एक वर्षापूर्वी, म्हणजे २००४ सालातील ऑक्टोबर महिन्यात 'काल'चे 'आज'साठी या सदरास प्रारंभ झाला. अर्थबोधपत्रिकेच्या या अंकात त्या उपक्रमाचा वर्षवाढदिवस साजरा होतो आहे. पत्रिकेच्या वाचकांनी या उपक्रमावर पसंतीची मुद्रा उठविली आणि त्यातून या सदराच्या स्वीकृतीची पावती मिळण्याबरोबरच हुरुपही वाढला. शंभरी उलटून गेलेल्या साहित्यातील, विशेषतः आजच्या युवा पिढीला भावेल, विचारप्रवृत्त करील असा सत्त्वांश या सदरातून मांडण्याचा उद्देश आणि परंपरेच्या चिकित्सेद्वारे तिच्यातील फोलकटे दूर सारून निके सत्त्व तेवढे समाजासमोर सादर करण्याचा केशवसुतांचा कविबाणा यांचा संगम साकारला आणि गेले वर्षभर या सदराद्वारे केशवसुतांचे कविमन आपल्याला काहीसे न्याहाळता आले. याचदरम्यान एक मोठा समसमा संयोग जुळून आला आणि तोही नकळतच. 'काल' चे 'आज' या सदरासाठी केशवसुतांच्या काव्यपंक्ती २००४ सालातील ज्या ऑक्टोबर महिन्यापासून निवडण्यात आल्या त्याच्या पुढच्याच महिन्यात, म्हणजे ७ नोव्हेंबर २००४ पासून केशवसुतांच्या स्मृतिशताब्दी वर्षास प्रारंभ झाला. १५ मार्च १८६६ ते ७ नोव्हेंबर १९०५ असे उणेपुरे ३९ वर्षांचे आयुष्य केशवसुतांना लाभले. साहजिकच, येत्या ७ नोव्हेंबर २००५ रोजी या स्मृतिशताब्दी वर्षाची सांगता होत असल्याने तो दिवस हा केशवसुतांचा स्मृतिशताब्दी दिन ठरतो, ही बाब सावंतवाडी येथे वास्तव्यास असणारे पत्रिकेचे एक साक्षेपी वाचक डॉ. मधुकर त्रिंबक घारपुरे यांनी अधोरेखित केली आणि त्याचबरोबर 'नोव्हेंबर २००५च्या अंकात कवी केशवसुत यांचेविषयी अधिक लेखन वाचण्यास मिळेल', अशी आशावजा अपेक्षाही व्यक्त केली. असे डॉ. घारपुरे यांच्यासारखे सुजाण वाचक ही पत्रिकेची मोठीच जमेची बाजू आहे. ऑक्टोबर २००४ ते ऑक्टोबर २००५ या वर्षभराच्या काळात, विशेषांक वगळता, एकूण १० अंकांत या सदराच्या माध्यमातून कविवर्यांच्या भेटी घडल्या. यापैकी आठांत केशवसुत तर दोन ठिकाणी रेव्हरंड ना. वा. टिळक आणि बा. सी. मर्ढेकर प्रत्येकी एकेकदा भेटून गेले. यातही एक मोठी विलक्षण मौज आहे पहा. केशवसुत आणि रेव्हरंड नारायण वामन

(पृष्ठ ३५ वर पाहावे)

# वाचकांचा प्रतिसाद

अलीकडेच 'अर्थबोधपत्रिके'चे काही अंक हाती पडले. पत्रिका वाचनीय असून तिचे वेगळेपणही मनात भरणारे आहे. पत्रिकेच्या जुलै २००५च्या अंकातील फ्रान्सः 'धर्मा'च्या मदतीने 'धर्मनिरपेक्षता' या लेखाने माझे लक्ष वेधून घेतले. फ्रान्समधील या संदर्भातील घडामोडींची भारतीय प्रसारमाध्यमांनी फारशी दखल घेतल्याचे वा त्यांच्या वृत्तांकनांसाठी आवर्जून जागा दिल्याचे आढळत नाही. आपण या विषयाची मांडणी निष्पक्षपणे केली असून तेथील धोरणकर्त्यांसमोर असलेला नेमका प्रश्न वाचकांसमोर मांडला आहे. मात्र, आपल्या मुलांना शाळेत पारंपरिक फेटा बांधून जाता येत नाही, याबद्दल तेथील शीखधर्मीयांमध्ये असलेल्या असंतोषाचा आपण उल्लेख केलेला नाही. आणखी एक बाब आपल्या निदर्शनास आणून द्यावीशी वाटते ती अशी की, डोक्यावर बांधण्यासाठी मुस्लिम स्त्रिया जो रुमाल वापरतात त्याचा निर्देश आपण 'हिजब' असा केलेला आहे. वास्तविक तो शब्द 'हिजाब' असा लिहायला हवा. भारतात त्याला गोषा अथवा बुरखा असे म्हटले जाते.

**डॉ. अ. दा. भोगले, बेंगळूर**

मध्यंतरी 'अर्थबोधपत्रिके'चे काही अंक वाचनात आले. त्यातील माहिती व लिखाणाचा दर्जा उत्तम असल्याचे जाणवले. मासिकाच्या वर्गणीसंबंधीची माहिती कळवावी ही विनंती.

**ल. ना. जमदग्नी, सांगली**

मी 'अर्थबोधपत्रिके'चा पूर्वीपासूनच एक वर्गणीदार आहे. पत्रिका अतिशय माहितीपूर्ण व विचाराला दिशा देणारी वाटते.

**प्र.भ. कुळकर्णी, पुणे**

## एक विनंती...

वाचकांचा प्रतिसाद हा कोणत्याही लेखन-संपादन व्यवहारातील जितका आनंदाचा तितकाच प्रबोधक भाग असतो. 'अर्थबोधपत्रिके'च्या अंतरंगासंदर्भात समाधान व्यक्त करणारी वाचकांची पत्रे ही उत्साह वाढविणारी अशीच असतात. परंतु त्याच्याच जोडीने, पत्रिकेकडून असणाऱ्या अपेक्षाही शब्दबद्ध करून पत्ररूपाने मांडल्यास अधिक संतोष होईल.

-संपादक

# परीक्षापद्धती कशी सुरू झाली ?

आजच्या युगाला कोणी 'विज्ञानयुग' म्हणेल तर कोणी 'ज्ञानयुग'. कोणी 'संगणकयुग' म्हणेल तर कोणी 'मोबाइलयुग'. पण आजच्या विद्यार्थ्याला विचारले तर तो याचे एक सोपे उत्तर 'परीक्षायुग' म्हणूनच देण्याची शक्यता आहे (त्याच्या या उत्तराला संपूर्ण गुण देण्यात यावेत!). अर्थात, कोणतेही युग म्हटल्याने परीक्षांचा ससेमिरा काही सुटणार नाही, हे विद्यार्थ्यांसह सर्वजण जाणून आहेत. पण तरीही विद्यार्थी असताना, कल्पनेच्या विश्वात भराऱ्या मारताना तुम्ही आम्ही आपण सगळ्यांनीच 'परीक्षा नसत्या तर....' असा निबंध शालेय जीवनात कधीतरी लिहिलेलाही असतो. गुण मिळविण्यासाठी अशा भराऱ्या मारल्या जातातच; तसेच, परीक्षा नको असे म्हणत अनेक जण परीक्षा देतदेतच उच्च पदावर पोचलेले असतात ! या परीक्षांसंबंधी शिक्षणतज्ज्ञ, शिक्षक, पालक, विचारवंत, धोरणकर्ते, शिक्षणसंस्थांचे संचालक, संबंधित यंत्रणेतील अधिकारी आणि खुद्द विद्यार्थी या सर्वांमध्ये वेगवेगळे मतप्रवाह आढळतात.

शालेय जीवनात परीक्षा नसाव्यातच, अशी एका गटाची भूमिका आहे; तर, परीक्षा असल्याच पाहिजेत, या दिशेकडे जाणाराही एक गट आहे. काहीजण मध्यम मार्ग अवलंबिणारे आहेत. त्यांना, काही सुधारणा केलेल्या, विद्यार्थ्यांवर फारशा ताण नसणाऱ्या परीक्षा हव्यात; तर त्यातील काहींना परीक्षेऐवजी क्षमताधिष्ठित मूल्यमापन हवे असते. कोणाला परीक्षा हव्यात पण क्रमांक नको असतो, मात्र त्यांना श्रेणी (ग्रेड) चालते. अशा सर्व वादंगात 'परीक्षा' या विषयाबाबत 'धरले तर चावते, सोडले तर पळते' अशी बहुतांश व्यक्तींची स्थिती होते.

शालेय अभ्यासक्रम व परीक्षा याबाबत अलीकडेच (सप्टेंबर २००५) 'एन.सी.ई.आर.टी'ने (NCERT) काही शिफारशी केल्या आहेत. त्यावर दिल्लीत 'सेंट्रल ॲडव्हायझरी बोर्ड ऑफ एज्युकेशन' (CABE) यांच्यातर्फे चर्चाही झाली. त्यानुसार चौथी व सातवीच्या राज्यस्तरीय परीक्षा नसाव्यात, दहावीची परीक्षा वैकल्पिक ठेवावी, बारावीच्या गुणांवर पुढील अभ्यासक्रमांना प्रवेश देण्याऐवजी केंद्रीय मंडळातर्फे

वर्षातून अनेकदा प्रवेशपरीक्षा घेतली जावी अशा अनेक सूचना करण्यात आल्या आहेत. त्यामुळे शालेय शिक्षण व परीक्षा हा विषय पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. या शिफारशी मान्य होतील अथवा नाही ही बाब वेगळी. मात्र, परीक्षा पूर्णपणे रद्द कराव्यात असे काही म्हणण्यात आलेले नाही. कारण, मूल्यमापन तर हवे. पण सध्याच्या परीक्षा-पद्धतीला योग्य पर्याय मात्र उपलब्ध नाही किंवा उपलब्ध असलेले पर्याय सर्वमान्य नाहीत, अशी आजची स्थिती आहे.

भारतात प्रचलित परीक्षापद्धती व शिक्षणाविषयी जशी चर्चा चालू आहे तसेच काहीसे ब्रिटनमध्येही सध्या घडत आहे. शालेय शिक्षणाचा विचार करता ब्रिटनमध्ये, 'जीसीएसई' (GCSE), 'एएस' (AS) आणि 'ए-लेव्हल' (A-level) अशा तीन प्रकारच्या परीक्षा असतात. अलीकडेच, यात काही बदल करण्याच्या सूचना सरकारने धुडकावून लावल्या आहेत. याशिवाय एकंदरीतच 'परीक्षा' या विषयात अनेक जण रस घेत आहेत; त्यातील एक आहेत रिचर्ड विल्स. ते शिक्षणविषयातील संशोधक-अभ्यासक आहेत. त्यांनी या प्रश्नाच्या मुळाशी जाऊन ब्रिटनमधील परीक्षा-पद्धतीचा उगम कसा झाला ते 'हिस्टरि टुडे' या नियतकालिकातील लेखाद्वारे सांगितले आहे. भारतावर इंग्रजांनी दीडशे वर्षे राज्य केले, हा इतिहास सर्वविदित आहे. ब्रिटिश असलेल्या मेकॉलेने भारतात इंग्रजांना राज्य करण्यास मदत करू शकणारा असा सुशिक्षित समाज तयार व्हावा, या उद्देशाने येथे विशिष्ट अशी शिक्षणपद्धती आणल्याने ब्रिटनमधील परीक्षा-पद्धतीचा परिणाम येथेही होणे स्वाभाविकच होते. या पार्श्वभूमीवर ब्रिटनमधील परीक्षा-पद्धतीचा उगम जाणून घेणे मनोरंजक ठरते.

विल्स यांना आढळले की, ॲडम स्मिथ या अर्थतज्ज्ञाने, 'वेल्थ ऑफ नेशन्स' (१७७६) या आपल्या प्रसिद्ध ग्रंथात सार्वजनिक परीक्षा घ्याव्यात, असे मत मांडले होते. अर्थात, परीक्षेसाठी कोणतीही यंत्रणा असली तरी त्यात सरकारी हस्तक्षेप होणे क्रमप्राप्त ठरेल, अशी शंका त्याने उपस्थित केली होतीच. शिक्षित व कार्यक्षम व्यक्ती/कामगार यांचे एकंदर समाज तसेच अर्थकारणातील महत्त्व लक्षात घेऊन ॲडम स्मिथने असे स्पष्ट केलें होते की, परीक्षेत सहभागी होणाऱ्यांमधील यशस्वी व्यक्तींना पुरस्कार देण्यात यावेत.

स्पर्धेच्या आधारावर आकारास येत असलेल्या व्यापारात स्पर्धापरीक्षांचे महत्त्व जेरेमी बेन्थॅम यांनी जाणले आणि ते शिक्षणक्षेत्रात तसेच सार्वजनिक सेवांसाठी करावयाच्या सेवकभरतीमध्ये आणले. परीक्षा-पद्धतीबाबतचा प्रस्ताव त्यांनी १८२७ मध्ये मांडला

आणि १८४६ मध्ये ब्रिटनमधील तत्कालीन शासनाने प्राथमिक शाळांमधील शिक्षकांसाठी पात्रता परीक्षा ठेवली. त्याच वर्षी प्राथमिक शाळांमधील शिक्षकांची पात्रता जोखण्याच्या हेतूने लंडन येथे 'कॉलेज ऑफ प्रिसेप्टर्स'ची (शिक्षकांची संस्था) स्थापना झाली. १८५० मध्ये प्रिसेप्टर्सची आर्थिक स्थिती बिघडल्याने उत्पन्नाचे काही नवीन मार्ग शोधण्याची गरज निर्माण झाली. याच्या तीन वर्षे आधी 'कॉलेज ऑफ प्रिसेप्टर्स'चे एक सदस्य जे.पी. हॉल यांनी शाळेतील विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात यावी, असा प्रस्ताव मांडला होता. सार्वजनिक बांधिलकी वा जबाबदारी (पब्लिक अकाउंटेबिलिटी) आणि राष्ट्रीय क्षमता (नॅशनल एफिशियन्सी) असे दोन उद्देश यामागे होते. २२ जून १८५० रोजी 'कॉलेज ऑफ प्रिसेप्टर्सने हा प्रस्ताव मान्य केला, तोही अतिरिक्त निधी उपलब्ध व्हावा या उद्देशाने. त्यानंतर 'कॉलेज ऑफ प्रिसेप्टर्स'च्या नियतकालिकात (१ डिसेंबर १८५०) परीक्षेसाठी शाळांनी आपल्या विद्यार्थ्यांना पाठवावे, असे आवाहन शाळांना करण्यात आले. यानंतर नॉटिंगहॅम येथील 'स्टॅंडर्ड हिल अकॅडमी'चे विद्यार्थी या प्रायोगिक तत्वावरील उपक्रमात सहभागी होतील, असे विलियम गुडाक्रे या सहमुख्याध्यापकाने 'कॉलेज ऑफ प्रिसेप्टर्स'ला कळविले. इतिहास, इंग्रजी व्याकरण, लॅटिन, ग्रीक आणि फ्रेंच या विषयांची विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जावी, असेही त्यांनी सुचविले. विद्यार्थ्यांना काय काय येते आहे यावरून एखाद्या प्रामाणिक शिक्षकाला आपले यशापयश जोखता येईल व त्यावरून त्याला आपले वेतन वाढवून मागता येईल, असे मत गुडाक्रे यांनी मांडले. त्यानंतर दोनच दिवसांनी डॉ. आर. विल्सन आणि जॉन पार्कर यांनी 'स्टॅंडर्ड हिल अकॅडमी'च्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली. परीक्षा घेतल्यानंतर विल्सन यांनी शाळेत फार सुरेख भाषण केले, अशी नोंद 'नॉटिंगहॅम जर्नल'मध्ये करण्यात आल्याचे आढळते.

ब्रिटनमध्ये, खाजगी शाळांच्या संदर्भात, शाळेच्या बाहेरील व्यक्तीने शाळेत येऊन परीक्षा घेण्याची सुरुवात विल्सन यांच्या १८५० मधील या घटनेवरून झाली. आधुनिक काळातील 'जीसीएसई' (GCSE) आणि 'ए-लेव्हल' (A-level) या परीक्षांच्या उगमासंदर्भात ही घटना पूर्वसूचक मानता येईल. 'कॉलेज ऑफ प्रिसेप्टर्स'ने उच्च माध्यमिक शाळांमधील मुलींसाठीदेखील परीक्षा घेण्याचे ठरविले. त्यानुसार डिसेंबर १८५१ मध्ये ३५ मुलींची परीक्षा घेण्यात आली. यानंतर विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यासाठी काही विशिष्ट पद्धती तयार करण्यात आल्या. सुरुवातीच्या काळात, प्रत्येक शाळेने शिकविलेल्या अभ्यासक्रमानुसार परीक्षा घेतल्या जाणे अपेक्षित होते. त्यामुळे 'परीक्षा'

या 'उपक्रमा'त सहभागी होणाऱ्या शाळेने आपली पाठ्यपुस्तके, शिकविण्याच्या पद्धती व इतर शैक्षणिक साधनसामग्री याची माहिती 'कॉलेज ऑफ प्रिसेप्टर्स'ला पाठविणेही अपेक्षित होते. यामुळे शाळांचे स्वातंत्र्य अबाधित राखणे शक्य झाले तरी त्याची प्रशासकीय बाजू मात्र गुंतागुंतीची होत गेली. त्यामुळे या सर्व प्रकारात सुधारणा होत गेल्या. शाळेतील शिक्षकांना शाळेतील विद्यार्थी परिचित असल्याने ते त्याच्या मूल्यमापनात सहभागी होत असत. पण यामुळे शाळेच्या परीक्षेतील निकालांवर लोकांचा विश्वास बसणार नाही, असे लक्षात घेऊन बाहेरून येणाऱ्या परीक्षकांना शाळेतील शिक्षकांनीच मदत करण्याची पद्धतही बंद करण्यात आली.

या परीक्षा-पद्धतीबाबत असेही म्हणण्यात येते की, प्रशिया येथे १७८८ मध्ये महाविद्यालयीन/विद्यापीठीय शिक्षणाची सुरुवात करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी घेतल्या जाणाऱ्या परीक्षेच्या धर्तीवरच या परीक्षा घेतल्या गेल्या होत्या. त्याचे आधुनिक रूप १८१२ मध्ये आकाराला आले. विविध विषयांचे शिक्षण घेणाऱ्यांची संख्या वाढू लागल्याने ही परीक्षा त्याकाळच्या शिक्षणव्यवस्थेमध्ये सामावून गेली. 'कॉलेज ऑफ प्रिसेप्टर्स'ची संकल्पना प्रशियाकडूनच उचलली गेली आणि विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय श्रेणी (ग्रेड) देण्याची पद्धतही तेथूनच घेण्यात आली. शालेय शिक्षणातील परीक्षांचे धागेदोरे हे प्रशियात सापडत असले तरी स्पर्धात्मक परीक्षेचे धागेदोरे मात्र ब्रिटनमधीलच होते. ऑक्सफर्ड आणि केंब्रिज विद्यापीठांत 'ऑनर्स' ही पदवी देताना अशा प्रकारच्या परीक्षा घेतल्या जात होत्या. परीक्षा-पद्धती रुजल्याने 'कॉलेज ऑफ प्रिसेप्टर्स'ची आर्थिक स्थिती सुधारली असा उल्लेख कॉलेजच्या 'फिफ्टी इयर्स ऑफ प्रोग्रेस' या प्रकाशनात केलेला आहे. शिक्षणाचा प्रसार, प्रचार होऊ लागला तसतसा परीक्षा हा प्रकार ब्रिटनमधील शिक्षणात रुजला.

इंग्रजांनी भारतावर दीडशे वर्षे राज्य केल्याने त्यांनी भारतात चालू केलेल्या या काही पद्धती आजही येथेच तशाच चालू राहिल्या आहेत. केवळ भारतातच नव्हे तर परीक्षा-पद्धती आता जगभरात इतकी पसरली व मुरली आहे की, परीक्षेशिवाय शिक्षणपद्धती ही अशक्यप्राय बाब वाटावी ! शिक्षणावरील परीक्षेचे भूत कसे उतरवावे, अशी जगभरच्या आजच्या शिक्षणतज्ज्ञांची चिंता आहे. शिक्षणाकडे एकदम वेगळ्याच दृष्टिकोणातून बघितले तर 'परीक्षां'मधून बाहेर पडणे शक्य होईल ?

*(संदर्भ - हिस्टरि टुडे - ऑगस्ट २००५ मधील रिचर्ड विल्स यांचा लेख. ते रोहेम्प्टन विद्यापीठातील शिक्षण संशोधन केंद्रात संशोधक-अभ्यासक आहेत.)*

कृषी

# ... मग शेतीचे नवतंत्र शेतकऱ्यांना शिकविते तरी कोण?

शेती कसण्याच्या नवनवीन पद्धती, जुन्या पिकांसंबंधीचे नवज्ञान, प्रगत, नवीन उत्पादक घटकांचा वापर हा एकूणच शेतीच्या दीर्घकालीन विकासाचा सर्वात महत्त्वाचा मार्ग आहे, हे आता सर्वांच्याच ध्यानात आले आहे. शेती करण्याच्या तंत्रमंत्रात घडून येत असलेल्या नवनवीन सुधारणांचे ज्ञान, त्यांबाबतची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोचावी, यासाठी देशातील शासनयंत्रणेने निरनिराळी माध्यमे निर्माण केली आहेत. रेडिओ, हे त्याचे एक उदाहरण. या व्यतिरिक्त, शेतीतंत्रासंबंधातील सुधारणांची माहिती पदरात पाडून घेण्याचे अन्य मार्ग शेतकऱ्यांना उपलब्ध आहेतच. नवनवीन तंत्रांचा, उपकरणांचा, वाणांचा आपापल्या शेतांवर वापर करून पाहणारे शेतकरी, अशा उत्पादक घटकांचे विक्रेते-दुकानदार यांसारखे घटक हे त्यांपैकीच दोन.

शेती व्यवसायाशी संलग्न बाबींमध्ये हे जे बदल, ज्या सुधारणा घडून येत असतात त्यांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत कोण पोचविते; एकूणांतील किती शेतकऱ्यांपर्यंत अशी माहिती पोचते, यासंदर्भात रोचक तपशील पुरविणारा एक अहवाल 'राष्ट्रीय नमुना पाहणी संघटने'ने (एन.एस.एस.ओ.) अलीकडेच प्रसिद्ध केला आहे. या बाबींचा मागोवा घेण्यासाठी २००३ साली संपूर्ण देशभर करण्यात आलेल्या नमुना पाहणीद्वारे संकलित करण्यात आलेली आकडेवारी व अन्य माहिती त्यात मांडली आहे.

शेतीतील सुधारणांसंदर्भातील माहिती विविध माध्यमांद्वारे मिळालेल्या अथवा अशा सुधारणांचे ज्ञान आपल्यास व्हावे यांसाठी प्रयत्न करणाऱ्या, ते मागवून घेणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण एकूणांत केवळ ४० टक्क्यांच्या आसपास आहे, असा या पाहणीचा एक निष्कर्ष आहे. शेती अथवा पशुपालन, मासेमारी यांसारख्या शेतीसंलग्न क्षेत्रांत उपलब्ध होत असलेल्या सुधारित तंत्रज्ञानाबाबत, त्या संदर्भातील माहिती मिळण्याबाबत उर्वरित ६० % शेतकरी अनभिज्ञच असल्याचे हा अहवाल सांगतो. ही झाली देशभरासाठीची सरासरी. अशा माहितीचा लाभ झालेल्यांची टक्केवारी ही पुन्हा राज्यवार बदलते. आंध्र प्रदेश (६२.७%) - कंसातील आकडा हा अशी माहिती पोहोचलेल्या शेतकऱ्यांची एकूणांतील टक्केवारी दर्शवितो - पश्चिम बंगाल (६०.९ %), गुजरात (५५.२ %)

आणि तामिळनाडू (५० %) हे, देशपातळीवरील सरासरी टक्केवारीपेक्षा ज्ञात्या शेतकऱ्यांची टक्केवारी अधिक असलेल्या राज्यांचे चित्र आहे. तर, त्या सरासरीपेक्षा ज्ञात्या शेतकऱ्यांची टक्केवारी कमी असलेल्या राज्यांतील चित्र - राजस्थान सर्वांत कमी म्हणजे १४.७ % छत्तीसगढ - २५ %, ओडिशा - २५.६ % आणि आश्चर्य म्हणजे पंजाब २६.७ % - असे आहे. शेतीच्या नवीन, आधुनिक तंत्राची माहिती पदरात पडलेल्या शेतकऱ्यांची महाराष्ट्रातील टक्केवारी ४६.२ इतकी आहे. तांदूळ तसेच गव्हाच्या अधिक उत्पादन देणाऱ्या प्रजाती, त्यांचे सुधारित वाण, या बी-बियाणांना लागणारी खते तसेच जंतूनाशकांची मात्रा यांबाबतची माहिती व अनुभवजन्य ज्ञान पंजाबातील शेतकऱ्यांना आज कित्येक वर्षे असल्याने त्या संदर्भातील पंजाबची टक्केवारी जेमतेम २७ टक्क्यांइतकी अल्प असणे संभवनीय आहे.

शेतीतील नवज्ञानाची, सुधारित यंत्र-तंत्राची माहिती एकूणांतील ज्या ४० % शेतकऱ्यांपर्यंत पोहोचल्याचे हा नमुना पाहणी अहवाल सांगतो ते हे शंभरातील चाळीस शेतकरी नेमके कसे, कोण आणि एकूणच 'शेतकरी' या मोठ्या वर्गाच्या कोणत्या स्तरांतील आहेत, याबाबत मात्र हा अहवाल मूक आहे. यापैकी बहुतांश शेतकरी हे मध्यम अथवा मोठे जमीनधारक असण्याची शक्यता आहे. देशभराप्रमाणेच महाराष्ट्रातीलही बहुतांश शेतकरी हे लहान शेतकरी अथवा अत्यल्प भूधारक सीमान्त शेतकरीच आहेत. या गटातील ज्या शेतकऱ्यांना सिंचनाची सुविधा उपलब्ध आहे; अथवा अल्प जमीनधारणा हेच प्रचलित वास्तव असणाऱ्या केरळसारख्या राज्यातील शेतकऱ्यांपैकी ज्या शेतकऱ्यांचे क्षेत्र तुलनेने त्यातल्या त्यात अधिक आहे असेच शेतकरी शेतीतंत्रातील सुधारणांची माहिती आपल्याला मिळावी, त्या नवज्ञानाचा आपण वापर करावा याबाबत प्रयत्नशील असतील, हेच अधिक संभवते.

शेतीमधील नवनवीन शोध, सुधारणा यांची माहिती गावपातळीवर शेतकऱ्यांपर्यंत नेऊन पोहोचविणारा आपल्या सध्याच्या व्यवस्थेतील विद्यमान माहिती-दूत म्हणजे ग्रामसेवक. शेतीसंबंधातील प्रगती, नवीन योजना यांच्या तपशीलाचा विस्तार (एक्स्टेन्शन) घडवून आणणे हे या सरकारी सेवकाचे एक महत्त्वाचे काम. मात्र, शेतकऱ्यांना उपयुक्त अशा प्रगत शेतीतंत्राचे ज्ञान त्यांच्यापर्यंत पोचविण्यासंदर्भात या घटकाचे आजचे योगदान किती, या बाबत या अहवालाने नोंदविलेली आकडेवारी विदारक आहे. ग्रामसेवकांकडून शेतीसंबंधातील सुधारणांची माहिती मिळालेल्या देशभरातील शेतकऱ्यांचे एकूणांतील प्रमाण आहे केवळ ५.७ टक्के! माहिती-विस्तार अथवा प्रसारणाच्या विद्यमान

माध्यमांपैकी सर्वाधिक निराशाजनक कामगिरी आहे ती याच माध्यमाची. ठायीठायी कार्यरत असणाऱ्या कृषीविज्ञान केंद्रांची अथवा शेतकऱ्यांसाठी वेळोवेळी आयोजित केल्या जाणाऱ्या प्रशिक्षण शिबिरांची या संदर्भातील कामगिरी तर केवळ नगण्यच आहे. खेडेगावातील त्यातल्या त्यात मोठ्या तसेच प्रगत शेतकऱ्यांपर्यंत ही माध्यमे (बहुधा) पोचतात आणि शेतीतील नवज्ञानाची माहिती शेतकऱ्यांच्या याच गटापर्यंत काय ती त्यांच्यामार्फत पोहोचते. या बड्या शेतकऱ्यांच्या अनुभवावरुनच मग गावातील अन्य मोठे तसेच मध्यम शेतकरी शेतीसंदर्भातील नवतंत्रे उचलतात. या विस्तार-माध्यमांचे प्रभाव क्षेत्र (म्हणजे एकूणांतील किती टक्के शेतकऱ्यांनी त्यांच्या माहिती-विस्तार कार्याचा लाभ घेतला ते) कमालीचे दुर्बळ असलेली राज्ये म्हणजे झारखंड (शून्य टक्के), बिहार (जेमतेम अर्धा टक्का), उत्तर प्रदेश (कसाबसा एक टक्का),राजस्थान आणि पंजाब जेमतेम दीड टक्का. गुजरात (२१.९ %), छत्तीसगढ (१५.५ %), तमिळनाडू (१३.३ %) आणि कर्नाटक (११.५ %) या चारच राज्यांतील ही विस्तार-माध्यमे एकूणांतील १० टक्क्यांपेक्षा अधिक शेतकऱ्यांपर्यंत पोचताना दिसतात. महाराष्ट्रात हेच प्रमाण आहे ७.६ टक्के. या यंत्रणांवर सरकार जो आणि जेवढा पैसा खर्च करते त्याचा हा परतावा!

शेतीसंदर्भातील नवज्ञानाबाबत शेतकऱ्यांचे माहिती-मित्र म्हणता येतील असे अन्य दोन सरकारी स्त्रोत म्हणजे रेडिओ आणि दूरदर्शन. एकूणांतील १३ टक्के शेतकरी रेडिओला; तर ९.३ टक्के शेतकरी दूरदर्शनाला आपले माहिती-दूत मानतात. आधुनिक शेतीतंत्राची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोचविण्याचे एक महत्त्वाचे माध्यम म्हणून जम्मू-काश्मीर ३६.३ %, आसाम २८.९ %, पश्चिम बंगाल २०.८ %, बिहार १७.३ %, तमिळनाडू १६.३ %, झारखंड १५.४ %, आणि उत्तर प्रदेश १५ % या राज्यांत रेडिओ खूपच सक्रिय असल्याचे हा पाहणी अहवाल सांगतो. महाराष्ट्रात मात्र रेडिओला शेतीविषयक माहितीचा दूत समजणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण आहे एकूणांत १२.६ %. राजस्थान, पंजाब, छत्तीसगढ आणि आंध्र प्रदेश या राज्यांत हे प्रमाण पाच टक्क्यांपेक्षाही कमी आहे. दूरदर्शनच्या संदर्भात बोलावयाचे तर, जम्मू-काश्मीर ३० %, केरळ २२.६ %, महाराष्ट्र २०.९ %, आणि तमिळनाडू १९.६ % या चार राज्यांत या माध्यमाचा प्रभाव सर्वाधिक दिसतो. अन्य राज्यांत मात्र तो दुर्बळच आहे.

शेतीउद्योगातील आधुनिक तंत्राची माहिती व ज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोचविणारी, शेतकऱ्यांच्या दृष्टीने सर्वाधिक महत्त्वाची दोन माध्यमे म्हणजे गावागावांतील प्रगत

शेतकरी आणि बी-बियाणे व खतांचे विक्रेते-दुकानदार. देशभरातील अनुक्रमे १७ % आणि १३ % शेतकरी हे या दोन घटकांना आपले माहिती-अग्रदूत मानतात. परिसरातील प्रगत शेतकरी हेच नवज्ञानाचे संवाहक आहेत, असे मानणाऱ्या शेतकऱ्यांचे मोठे प्रमाण आंध्र प्रदेश (३४.१० %), गुजरात (३० %), पश्चिम बंगाल (२४.७ %) आणि तमिळनाडू (२१ %) या चार राज्यांत आढळते. जम्मू-काश्मीर, छत्तीसगढ, पंजाब, राजस्थान अथवा ओडिशा व झारखंडसारख्या राज्यांत मात्र हे प्रमाण अत्यल्प आहे. हीच बाब बी-बियाणे अथवा खते-जंतूनाशके पुरविणाऱ्या विक्रेते-दुकानदारांची. पश्चिम बंगाल (३५.६ %), आंध्र प्रदेश (३०.१० %) आणि गुजरात (२४.३० %) या तीन राज्यांत एकूणांतील २५ ते ३३-३४ टक्के शेतकऱ्यांपर्यंत नवतंत्रांची माहिती या विक्रेत्यांमार्फत झिरपत असल्याचे हा पाहणी अहवाल सांगतो. महाराष्ट्रामध्ये मात्र, शेतीविषयक नवमाहितीसाठी या उभय स्त्रोतांवर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण एकूणांत प्रत्येकी १७ टक्के इतके आहे. अन्य बहुतेक राज्यांमध्ये माहितीच्या या स्त्रोतास प्रमाण मानणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण एकूणांत १० टक्क्यांपेक्षा कमी आहे.

प्रादेशिक भाषांमधील वृत्तपत्रेही शेतीविषयक माहितीपर मजकूर अलीकडील काळात प्रकाशित करू लागली आहेत. मात्र त्यांचाही प्रभाव मर्यादितच असल्याचा या अहवालाचा निष्कर्ष आहे. देशभरातील केवळ सात टक्के शेतकरीच काय ते शेतीविषयक नवीन माहितीसाठी वृत्तपत्रांवर विसंबून राहतात, असे दिसते. शेतीविषयक नवतंत्राच्या ज्ञानासाठी वृत्तपत्रांकडे माहितीचे एक माध्यम म्हणून पाहणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण केरळमध्ये सर्वाधिक म्हणजे ३७.८ टक्के इतके आहे. त्या नंतर महाराष्ट्र (१४.६ %), आणि तमिळनाडू (१४.३ %) यांचा क्रमांक लागतो. या माध्यमाचा अन्य राज्यांतील शेतीसंबंधित प्रभाव बव्हंशी क्षीणच आहे. साक्षरतेचे शेतकरी वर्गातील अल्प प्रमाण, हे यामागील एक मुख्य कारण संभवते. रेडिओ तसेच दूरदर्शन यांसारख्या दृक-श्राव्य माध्यमांवरील शेतकऱ्यांचे तुलनेने अधिक असणारे अवलंबन, ही याच चित्राची दुसरी बाजू. ग्रामीण भागांत वृत्तपत्रांचा तुलनेने कमी/विरळ असणारा प्रसार हेही आणखी एक कारण संभवते. तसेच, शेतीसंदर्भातील जो मजकूर प्रादेशिक वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध केला जातो तो शेतकऱ्यांच्या दृष्टीने बराचसा अप्रस्तुत, निरुपयोगी असल्याने ते या माध्यमाकडे शेतीविषयक नवमाहितीचा स्त्रोत म्हणून पाहत नसावेत.

कोणत्याही का होईना, परंतु माध्यमामार्फत शेतकऱ्यांपर्यंत पोचलेल्या आधुनिक माहितीचा शेतकरी प्रत्यक्ष व्यवहारात काय व कितपत उपयोग करतात, हा याच

प्रश्नाचा पुढील टप्पा. कोणत्याही एका स्त्रोतामार्फत माहिती पदरात पाडून घेणाऱ्या शेतकऱ्यांपैकी निम्म्या शेतकऱ्यांनी, त्यांच्यापर्यंत पोचणारी माहिती 'चांगली' असल्याचा अभिप्राय नोंदविला आहे. अर्थातच, या प्रतिसादातही राज्यनिहाय फरक आढळून येतो. महाराष्ट्रात मात्र, शेती उपयोगी जिनसांच्या विक्रत्यांनी तसेच शेतीविषयक माहितीचा विस्तार घडवून आणण्यासाठी नियुक्त केलेल्या यंत्रणेमार्फत पुरविली गेलेली माहिती शेतकऱ्यांना तुलनेने कमी उपयुक्त वाटत असल्याचे हा अहवाल सांगतो.

शेतीशी संलग्न अशा बाबींसंदर्भात प्रगत शेतकरी तसेच शेतीउपयुक्त वस्तू-उत्पादनांचे विक्रेते-पुरवठादार यांनी पुरविलेली माहिती आवर्जून उपयोगात आणून पाहणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण हे, या दोन स्त्रोतांकडून नवज्ञान संपादन करणाऱ्या देशभरातील एकूण शेतकऱ्यांत ८० टक्क्यांहूनही अधिक आहे, ही बाब लक्षणीय मानावयास हवी. रेडिओ तसेच दूरदर्शन यांसारख्या माध्यमांद्वारा मिळणाऱ्या माहितीचा लाभ घेणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण महाराष्ट्रात अधिक असले तरी अशा शेतकऱ्यांपैकी जेमतेम ४० टक्के शेतकरीच त्या माहितीचे उपायोजन व्यवहारात करून पाहतात. प्रगत शेतकऱ्यांनी वापरून पाहिलेले नवज्ञान तसेच शेतीउपयोगी साहित्याच्या विक्रेत्यांनी पुरविलेली माहिती व्यवहारात लगोलग वापरून पाहणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण एकूणांतच अधिक असल्याचे ही पाहणी सांगते. मात्र, विविध माध्यमांद्वारे प्रसृत केल्या जाणाऱ्या माहितीचा विचार करता, या अशा माहितीची गुणवत्ता, विश्वासार्हता आणि ती माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोचविण्याच्या वेळकाळाचा नेमकेपणा यांत सुधारणा होण्याची गरज शेतकऱ्यांनी सर्वदूर व्यक्त केली आहे.

शेतीक्षेत्राच्या एका अतिशय महत्त्वाच्या अंगासंदर्भातील तितक्याच महत्त्वाच्या तपशीलाचा ऐवज खुला करणारा हा पाहणी अहवाल सगळ्यांनाच अंतर्मुख बनविणारा असा आहे. विशेषतः सरकारला! कृषीविषयक आधुनिक ज्ञान व माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोचावी यासाठी निर्माण करण्यात आलेल्या ग्रामसेवक तसेच वरकड विस्तारयंत्रणेची उपयुक्तता आणि प्रस्तुतता यांचा गंभीरपणे पुनर्विचार करण्याची निकड यामुळे समोर आली आहे. केवळ इतकेच नाही तर, आपण प्रसारित करीत असलेल्या माहितीच्या गुणवत्तेबाबत रेडिओ, दूरदर्शन तसेच वृत्तपत्रादी माध्यमांनाही यामुळे अधिक सजग बनावे लागेल.

*(संदर्भ- 'ॲक्सेस टू मॉडर्न टेक्नॉलॉजी फॉर फार्मिंग' : राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेचा अहवाल: जून- २००५).*

✿✿

आर्थिक

# आर्थिक सुधारणांच्या संतुलित वाटचालीसाठी...

भारत आणि चीन हे परस्परांचे सख्खे शेजारी. दोन्ही देश प्राचीन संस्कृतीचे संचित लाभलेले. उभय देशांच्या अर्थव्यवस्थाही आजच्या जगात, हेवा वाटावा अशा वेगाने पुढे सरकणाऱ्या. परिणामी, आशिया खंडातील या दोन भरपूर क्षमता असणाऱ्या उभरत्या अर्थव्यवस्थांचा निर्देश अनुक्रमे 'वाघ' आणि 'ड्रॅगन' असाच केला जातो (आशियाई वाघ म्हणतात ते वेगळे!). साहजिकच, वाघ आणि ड्रॅगन यांच्या कथित आणि कल्पित स्पर्धेचीही चवीचवीने चर्चा होत असते. या दोन अर्थव्यवस्थांच्या अंगभूत क्षमता, भविष्यातील विकासाच्या संधी याबाबत वारंवार परिसंवादांचे फड झडत असतात. त्यातही पुन्हा विशेष बोलबाला असतो तो चीनने आजवर राबविलेल्या सुधारणांचा. विशेषतः, या सुधारणांचा चीनच्या अर्थकारणावर काय व कसा परिणाम झाला याबरोबरच या सुधारणांना जागतिक समुदायाने जो प्रतिसाद दिला तो सर्वांच्याच औत्सुक्याचा आणि तितकाच अभ्यासाचा विषय आहे.

आर्थिक सुधारणांची पायाभरणी चीनने ७०च्या दशकातच केली. १९९१ साली भारतामध्ये सुधारणा पर्वाचा उदय झाला. परंतु, त्या पर्वाचे सुतोवाच १९८५ मध्ये राजीव गांधी यांच्या कारकिर्दीत झाले, असेही कित्येक अभ्यासक मानतात. या गणितानुसार चीनमधील सुधारणा भारताआधी सुमारे एक ते दीड दशक आकारास आल्या, असे आढळते. या सुधारणांची फळेही चीन १९८०च्या दशकापासून चाखतो आहे. चीनच्या वार्षिक वाढीचा सरासरी दर १९८१ सालापासून सातत्याने १० टक्क्यांच्या आसपास राहिलेला आहे. चीनचे दरडोई उत्पन्न आज भारताच्या जवळजवळ दुप्पट आहे. गरिबी-रेषेखाली जगणाऱ्यांचे प्रमाण पाच टक्क्यांच्याही खाली गेले आहे. चिनी वस्तू तसेच सेवांची निर्यात अलीकडील काही वर्षांत सरासरी सुमारे १५ टक्के दराने दरवर्षी सातत्याने वाढताना दिसते. जागतिक निर्यातीत चीनचा हिस्सा आज जवळपास सहा टक्क्यांपर्यंत उंचावला आहे. एकंदरच, 'ड्रॅगन'ची दौड चालू आहे, असेच चित्र दिसते.

'ड्रॅगन'च्या तुलनेत 'वाघ' मात्र दुडक्या चालीनेच वाटचाल करताना दिसतो. १९८०च्या दशकाच्या अखेरीपासून भारतीय अर्थव्यवस्थेच्या वार्षिक वाढीचा सरासरी

दर सहा टक्क्यांच्या आसपासच रेंगाळतो आहे. निर्यातवाढही ११ टक्क्यांच्या परिसरात आहे. गरीबी रेषेखालील लोकसंख्येचे प्रमाणही चांगले २६ टक्केइतके आहे. जागतिक निर्यातीमधील हिस्सा जवळपास नगण्य म्हणजे एक टक्क्याहूनही कमी आहे. अगदी १९९१ नंतर, म्हणजे उदारीकरणाचे वारे भारतीय अर्थव्यवस्थेत खुलेपणाने वाहू लागल्यानंतरच्या दीड दशकातही, चीनमध्ये थेट गुंतविल्या गेलेल्या परदेशी भांडवलाच्या जेमतेम १० टक्के थेट परदेशी गुंतवणूक भारतात आली. हे असे का?....नेमक्या याच प्रश्नांचा धांडोळा भारतीय अर्थविज्ञानाचे कोलंबिया विद्यापीठातील अध्यापक-अभ्यासक अरविंद पांगारिया यांनी आपल्या 'ए पॅसेज टू प्रॉस्परिटी' या अतिशय उद्‌बोधक लेखात घेतला आहे.

गेल्या सुमारे २० वर्षांत भारतीय उद्योग क्षेत्राची (तुलनेने) असमाधानकारक, खराब राहिलेली कामगिरी, हे साऱ्या समस्येचे, 'वाघा'च्या अडखळत्या चालीचे मूळ आहे असे पांगारिया यांचे विश्लेषण आहे. या संदर्भात त्यांनी सादर केलेली आकडेवारीही कमालीची बोलकी आहे. १९९० ते २००० या दहा वर्षांच्या काळात, चीन तसेच भारत या दोन देशांच्या अर्थव्यवस्थांमध्ये घडून आलेले स्थित्यंतर अतिशय मननीय आहे. या दशकादरम्यान, चीनच्या ठोकळ देशी उत्पादनातील (ग्रॉस डोमेस्टिक प्रॉडक्ट -जी.डी.पी.) उद्योगक्षेत्राचा हिस्सा जवळपास ४२ टक्क्यांवरून ५१ टक्क्यांपर्यंत वाढला. याच कालावधीत, भारताच्या ठोकळ देशी उत्पादनातील उद्योगक्षेत्राचे योगदान मात्र २७ टक्क्यांवरच खिळून राहिले! मुळात, १९९१ सालीच उभय देशांच्या ठोकळ देशी उत्पादनात उद्योगक्षेत्राच्या असणाऱ्या सहभागात लक्षणीय फरक होता (चीनः ४१.६ टक्के; भारतः २७.६ टक्के) ही बाबही या ठिकाणी आवर्जून ध्यानात ठेवावयास हवी.

याच दशकादरम्यान, सेवाक्षेत्राचे भारताच्या ठोकळ देशी उत्पादनात असणारे योगदान ४१ टक्क्यांवरून ४८ टक्क्यांपर्यंत उंचावले; तर, चिनी ठोकळ उत्पादनात मात्र याच क्षेत्राचा हिस्सा ३०-३१ टक्क्यांच्या परिघातच स्थिर राहिला. शेती आणि उद्योग ही अर्थव्यवस्थेतील वस्तु-उत्पादक क्षेत्रे. याचाच अर्थ हा की या दोन क्षेत्रांचे ठोकळ देशी उत्पादनात जवळपास ७१-७२ टक्क्यांचे योगदान (वर्ष - २०००) असणारी चिनी अर्थव्यवस्था ही वस्तु-उत्पादनप्रधान गणावयास हवी. तर, ठोकळ देशी उत्पादनात सेवाक्षेत्राचा सहभाग जवळपास ४८ टक्क्यांचा (वर्ष - २०००) आणि वस्तु-उत्पादन क्षेत्रांचा हिस्सा ५२ टक्क्यांचा असणारी भारतीय अर्थव्यवस्था कृषिप्रधानतेकडून सेवाबहुलतेकडे सरकणारी म्हणावयास हवी. १९९० ते २००० या दहा वर्षांच्या काळात

भारताच्या ठोकळ देशी उत्पादनातील वस्तु-उत्पादन क्षेत्रांचा सहभाग ५९ टक्क्यांवरून सुमारे ५२ टक्क्यांपर्यंत खाली आला, ही या स्थित्यंतरातील विशेषत्त्वाने लक्षवेधक अशी बाब.

अर्थविकासाचे प्रस्थापित 'मॉडेल' तसेच अर्थव्यवस्थांच्या विकासाचा आजवरचा अनुभव यांच्या जगभरच्या पठडीस भारतीय अर्थकारणात घडून येत असलेले स्थित्यंतर छेद देणारे आहे. विकासाचे अर्थशास्त्र शिकविते त्यानुसार, आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत पायाभूत कामगिरी बजावते ते कृषीक्षेत्र. शेतीचा विकास हा त्यापुढील औद्योगिक विकासाची पायाभरणी करतो. शेतीतील तांत्रिक प्रगतीमुळे जमिनीची उत्पादकता वाढून धान्योत्पादन वाढते. तसेच उद्योगांना लागणाऱ्या कच्च्या मालाचेही उत्पादन वाढते. त्यातून, उद्योगक्षेत्रास किफायतशीर दराने कच्चा माल उपलब्ध होऊन औद्योगिक उत्पादनही वाढू लागते. असा किफायतशीर कच्चा माल मुबलक असल्याने पक्का माल स्पर्धात्मक किमतींना तयार करणे उद्योगांना शक्य होते. किमती स्पर्धात्मक असल्याने या मालाला बाजारपेठही चटकन मिळते. यातून उद्योगांच्या वाढीचे चक्र स्वयंचलित गतीने पुढे सरकू लागते. या वाढीमधूनच शेती आणि उद्योग या दोन क्षेत्रांमध्ये उत्पादक स्वरूपाचे संबंध तयार होतात. उद्योगांच्या विस्ताराद्वारे शेतीसाठी उपयुक्त अशी यंत्रसामग्री, उपकरणे, हत्यारे-अवजारे यांचे उत्पादन सुरू होते. त्यातून शेतीच्या उत्पादकतावाढीस चालना मिळते. एकूणच वैज्ञानिक-तांत्रिक प्रगतीचाही शेतीच्या उत्पादकता-उत्पादनवाढीस हातभार लागतो. त्याद्वारे एकूणच शेती व शेतीसंलग्न उद्योग-व्यवहारांमध्ये गुंतलेल्या लोकसमूहांचे उत्पन्न आणि क्रयशक्ती वाढू लागते. त्यातून खाद्यप्रक्रिया, कपडे, औषधे, गृहोपयोगी उपकरणे, ग्राहकोपयोगी वस्तू यांसारख्या उद्योगांच्या उत्पादनांना असणारी मागणी वाढू लागते. या चक्रनेमिक्रमाने शेती आणि उद्योग अशा उभय क्षेत्रांमधील उत्पादकता - उत्पादन - उत्पन्न - मागणी - गुंतवणूक - रोजगार - उत्पन्न - मागणी - गुंतवणूक ही कडी गतिमान बनते. चक्राच्या प्रत्येक फेऱ्याबरोबर या कडीमधील गुणक वर्धिष्णू बनत जातो आणि या साऱ्याचा एकत्रित परिणाम म्हणजे अर्थव्यवस्थेचे एकंदरच वस्तुनिर्माण क्षेत्र चांगले औरसचौरस, विस्तृत, वैविध्यपूर्ण आणि सुदृढ बनते.

याच संपूर्ण प्रक्रियेदरम्यान नागरीकरणालाही चालना मिळते. ग्रामीण भागांकडून शहरांकडे होणारे स्थलांतरण, प्रगत उद्योगांची स्थापना आणि विस्तार, वाढती लोकसंख्या व व्यापार यातून वाहतूक, दळणवळण, साठवणूक, बँकिंग, विमा, पर्यटन, रस्तेबांधणी,

घरनिर्मिती यांसारख्या सेवाक्षेत्राच्या वाढीस इंधनपुरवठा होतो. चांगल्या विस्तारलेल्या, बळकट वस्तुनिर्माण क्षेत्राच्या पायावर फोफावणाऱ्या सेवाक्षेत्राची इमारत तोलली जाते आणि एकूणच अर्थव्यवस्था विकासाच्या परिपक्व अवस्थेत प्रवेशते. वस्तुनिर्मितीकडून सेवानिर्मितीकडे आणि त्यातून पुढे वस्तू तसेच सेवाक्षेत्रांच्या संतुलित आणि सुदृढ साहचर्याकडे असा हा टप्प्याटप्प्याने होणारा क्रमवार प्रवास असतो. यात, अर्थव्यवस्थेत विविध पातळ्यांवर उपलब्ध असणाऱ्या निरनिराळ्या उत्पादक घटकांचा साधारणपणे पुरेपूर वापर घडून येतो. अर्थव्यवस्थेतील उच्च विद्याविभूषित, तंत्रकुशल मनुष्यबळ माहिती तंत्रज्ञान, बँका, विमा, परदेश व्यापार, अत्याधुनिक उद्योग यांसारख्या क्षेत्रांत सामावून घेतले जाते. तर, अर्धशिक्षित, अल्पशिक्षित, स्वल्पकुशल, अकुशल कामगारांना शेती, लघु तसेच मध्यम उद्योग, पूरक उद्योग, प्रक्रिया उद्योग यांसारख्या क्षेत्रांत उत्पादक स्वरूपाचा रोजगार उपलब्ध होतो.

परंतु, पांगारिया यांच्या विश्लेषणानुसार भारतीय अर्थव्यवस्था उद्योगक्षेत्राला बगल देऊन एकदम सेवाप्रधान अर्थकारणाकडे सरकते आहे. १९८०-८५ पर्यंत साध्य झालेली शेतीतील प्रगती आणि तिथून एकदम उड्डाण करून सुधारणा पर्वादरम्यान पुढे सरसावलेले बँकिंग, विमा, माहिती-तंत्रज्ञान तसेच माहिती-तंत्रज्ञानाधारित सेवा, व्यापार, वित्तीय सेवा, बांधकाम यांसारख्या आधुनिक सेवाउद्योगांकडे घेतलेली झेप असे भारतीय अर्थकारणात अलीकडील काळात घडून आलेल्या स्थित्यंतराचे स्वरूप आहे. भारतातील शिक्षणक्षेत्राचा वाढता पसारा, माहिती-तंत्रज्ञान तसेच माहिती-तंत्रज्ञानाधारित सेवाउद्योगांसाठी उपयुक्त असणाऱ्या उच्चशिक्षित, कुशल मनुष्यबळाचा साठा अशी पूरक परिस्थिती सध्या असल्याने उद्योगक्षेत्राच्या विस्तारास वळसा घालून आलेल्या आजवरच्या विकासप्रक्रियेचे वावडे असण्याचे कारण नाही; माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रात भारतास असणाऱ्या वैश्विक संधींचा लाभ उठवित विकासाची येथवरची प्रगती याच दिशेने पुढे न्यावयास हरकत नाही, अशी एक भूमिका यासंदर्भात अलीकडे काही व्यासपीठांवरून मांडण्यात येते.

या भूमिकेमधील कच्चे दुवे पांगारिया यांनी अतिशय सूत्रमय पद्धतीने विशद केले आहेत. मुळात आजही माहिती-तंत्रज्ञान क्षेत्राचा भारताच्या ठोकळ राष्ट्रीय उत्पादनातील हिस्सा दोन टक्क्यांपेक्षाही कमी आहे. म्हणजेच, देशाच्या एकंदर अर्थकारणाच्या दृष्टीने या उद्योगाचा पाया तसा अल्पस्वल्पच आहे. परिणामी या क्षेत्रावरच लक्ष एकवटले तरी वरकड अर्थव्यवस्थेच्या उद्धारास त्याचा कितपत लाभ होईल? विशेषतः, भारतातील

श्रमिकांपैकी ६० टक्के श्रमिक हे या ना त्या प्रकारे शेतीवरच निर्भर आहेत, ही बाब लक्षात घेता नव्याने होणारी रोजगारनिर्मिती ही बँकिंग, विमा, वित्तीय सेवा, संदेशवहन, माहिती-तंत्रज्ञान यांसारख्या उच्च दर्जाच्या ज्ञानाची, कौशल्यांची मागणी करणाऱ्या क्षेत्रांमध्येच एकवटली अथवा केंद्रीभूत झाली तर अतिरिक्त मनुष्यबळाचा शेतीवरील भार कमी कसा व्हावा?

उद्योगांच्या विस्तारास बगल देऊन थेट आधुनिक, नागरी आणि सेवाक्षेत्रप्रधान अशा विकासाच्या परिपक्व अवस्थेत भारतीय अर्थव्यवस्था पाय रोवू शकेल, ही भूमिका पांगारिया यांना अवाजवी, अतिरंजित वाटते ती यामुळेच. शेतीवरील अतिरिक्त भार हटविण्यासाठी अर्थव्यवस्थेत अकुशल तसेच अल्प अथवा मध्यम कुशल श्रमिकांसाठी श्रमसघन रोजगार निर्माण होण्याखेरीज अन्य पर्याय नाही. अशा रोजगार संधी निर्माण करण्याची क्षमता आधुनिक सेवाक्षेत्रांपेक्षाही उद्योगांमध्येच प्राधान्याने आहे, या आपल्या मतावर पांगारिया ठाम आहेत. याचे त्यांनी दिलेले कारणही सयुक्तिक आहे. कोणत्याही प्रकारच्या, कोणत्याही स्तरावरील उद्योगात काम करताकरताच, प्रत्यक्षानुभवातून शिकण्यास कशाही प्रकारची शैक्षणिक पार्श्वभूमी असलेल्या कामगारास भरपूर वाव असतो. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे तर, 'ऑन जॉब ट्रेनिंग' ही प्रशिक्षण प्रणाली औद्योगिक क्षेत्रात सहज अवलंबिता येते. बँकिंग, वित्तीय सेवा, माहिती-तंत्रज्ञान, दळणवळण, संदेशवहन, विमा यांसारख्या, कर्मचाऱ्यांकडून उच्च दर्जाच्या काही किमान औपचारिक महाविद्यालयीन शिक्षणाची अपेक्षा करणाऱ्या क्षेत्रांमध्ये मात्र या प्रकारच्या कार्यानुभवाधारित शिक्षणप्रणालीस तसा वाव नाही.

याचाच अर्थ हा की अर्थव्यवस्थेची विकासप्रक्रिया ही सेवाकेंद्रित करावयाची असेल, अथवा होणार असेल तर उपजीविकेसाठी आज शेतीवरच पूर्णतः अवलंबून असणाऱ्या कुटुंबांतील मुलांना (म्हणजेच पुढील पिढ्यांना) पुढे सेवा क्षेत्रांत नोकरीच्या संधी खुल्या व्हाव्यात यासाठी अनुरूप दर्जाच्या उच्च/महाविद्यालयीन शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यावर लक्ष केंद्रित करावे लागेल. म्हणजेच, त्यादृष्टीने अनुरुप असणारे उच्च शिक्षणविषयक धोरण आखून त्याची काटेकोर अंमलबजावणी करणे भाग आहे. तसे जरी एकवेळ केले तरी त्यामुळे फारतर प्रश्न सुटेल तो श्रमिकांच्या भावी पिढ्याचा. परंतु, शेतीमध्ये आजच गुंतलेल्या अतिरिक्त मनुष्यबळाच्या समस्येवर आणि त्यातून निपजणाऱ्या छुप्या बेरोजगारीच्या दुखण्यावर त्यामुळे उपाय मिळत नाही तो नाहीच.

पांगारिया यांच्या प्रतिपादनाप्रमाणे, म्हणूनच, भारतीय अर्थव्यवस्थेच्या भावी वाटवालीचा गाडा पुढील काळात 'परंपरागत श्रमप्रधान उद्योग' आणि 'अत्याधुनिक माहिती-तंत्रज्ञान उद्योग' अशा दोन चाकांवर संतुलितपणे चालवावा लागेल. तो तसा चालावा या दृष्टीनेच सुधारणांच्या दुसऱ्या टप्प्यातील धोरणांचे स्वरूप व दिशा असणे आवश्यक ठरते. त्यासाठी पांगारिया यांनी आग्रहाने मांडलेला त्या सुधारणांचा 'ब्लू प्रिंट' हा औद्योगिक कलह कायद्यातील बदल, केंद्र तसेच राज्य सरकारांच्या तिजोरीचा ढासळलेला तोल सांभाळणे, दर्जेदार पायाभूत सुविधांचा पुरवठा आणि उच्च शिक्षणासंदर्भातील विद्यमान धोरणाचा मुळापासून फेरविचार या चतु:सूत्रीवर बेतलेला आहे. यातील पहिल्या तीन बाबींची नाळ ही उद्योगविश्वाच्या पुनरुत्थानाशी तर चवथीची नाळ माहिती-तंत्रज्ञानक्षेत्राच्या भविष्यातील स्पर्धात्मकतेशी निगडित आहे.

औद्योगिक कलह कायद्याच्या कामगार कपातीसंदर्भातील विद्यमान तरतूदींपायी केवळ बहुराष्ट्रीयच नव्हे तर देशी संघटित मोठे उद्योगही तयार कपड्याचे उत्पादन, लहान मुलांची खेळणी तयार करणे यांसारख्या श्रमसघन तसेच अकुशल अथवा अल्पकुशल कामगारप्रधान क्षेत्रांमध्ये भारतात गुंतवणूक करण्यास अनुत्सुक आहेत. परिणामी, भांडवलसघन अशा औषधनिर्मिती, यंत्रोपकरणे, वाहन उद्योग, माहिती-तंत्रज्ञान यांसारख्या उद्योगांवर भारतीय औद्योगिक क्षेत्राचा भर राहिला असल्याचे पांगारिया यांचे निरीक्षण आहे. तर दुसरीकडे, केंद्र तसेच राज्य सरकारांच्या एकत्रित वित्तीय तुटीचे ठोकळ देशी उत्पादनाशी असणारे प्रमाण जवळपास १० टक्क्यांपर्यंत पोहोचल्याने देशांतर्गत बचतीचा मोठा हिस्सा तुटीचा हा खड्डा भरून काढण्यासाठीच खर्ची पडतो. परिणामी, ही बचत ना उद्योगांना गुंतवणूकीसाठी उपलब्ध होते ना पायाभूत सुविधांच्या पूर्ततेकडे तिचा प्रवाह वळतो. देशातील पायाभूत सुविधांची दयनीय अवस्था ही उद्योगांच्या प्रगतीतील पुढील अडथळा. सरकारच्या वित्तव्यवहारांचा तोलही ढळलेला असल्याने उच्च शिक्षणावरील सरकारी खर्चात आवश्यक ती वाढ पुरेशा वेगाने होईल, याची शाश्वती पांगारिया यांना वाटत नाही. त्यामुळे, उच्चशिक्षित मनुष्यबळाच्या बाजारपेठेत असंतुलन निर्माण होऊन भारतीय माहिती-तंत्रज्ञान उद्योगास आज मिळत असलेला 'कॉस्ट ॲडव्हान्टेज्' पुढे किती काळ टिकून राहील, अशी रास्त शंका पांगारिया यांनी व्यक्त केली आहे.

'सेकंड जनरेशन रीफॉर्म्स'ची चर्चा करणारे या सगळ्याकडे 'कान' देतील का? *(संदर्भ- फार ईस्टर्न इकॉनॉमिक रिव्ह्यू , जुलै-ऑगस्ट: २००५)* ✿✿

बदलते स्त्रीजग

# विस्तारलेले अवकाश आणि.......

गेल्या दोन शतकांत शिक्षणाचे अवकाश जगभर विस्तारले आणि स्त्रीमनाला त्याने आपल्यात सामावून घेतले. या बदलाचे स्वागत करीत विस्तारलेल्या अवकाशांत भरारी घेण्यासाठी अनेकानेक समाजसुधारकांनी स्त्रियांना उद्युक्त केले. स्त्रियांनीही या अवकाशात पंख पसरले आणि त्या पदवीधर, द्विपदवीधर होऊ लागल्या. त्या सुमारास चालू झालेल्या औद्योगिकरणाच्या व शहरीकरणाच्या प्रक्रियेत, विविध क्षेत्रांत लहान-मोठ्या रोजगाराच्या संधी त्यांच्यासाठी उपलब्ध झाल्या. याबरोबरच बदलत्या आर्थिक, सामाजिक परिस्थितीत कुटुंबासाठी अर्थार्जनाची गरज निर्माण झाल्याने मध्यमवर्गीय तरुणी/स्त्रिया नोकऱ्यांकडे झेपावल्या. नोकरी करता करता स्त्रियांना आपल्या क्षमता जोखता आल्या; तसेच या क्षमतांना वावही मिळाला. मग, काळाच्या ओघात स्त्रियांची झेप 'करियर वुमन'च्या दिशेने वळली. या बदललेल्या दिशेने आता तिला पेचात पाडले आहे. ही दिशा आता एकीकडे तिला मागे फिरण्यास अटकाव करते आहे आणि दुसरीकडे, पुढे जाण्यासाठी मात्र अनंत अडचणींचा सामना करण्यास कटिबद्ध व्हावयास सांगते आहे. तेव्हा, 'आता काय करावे ?', या कात्रीत आजची स्त्री अडकली आहे.

नोकरदार स्त्रीचे, 'करियर वुमन'चे प्रश्न, अडचणी, आशा-अपेक्षा या सर्वांची मांडणी अनेक प्रसारमाध्यमे सतत करीत असल्याने विविध स्तरांत त्याबद्दल बरीच जागृती आणि समजही निर्माण झालेली आहे. त्यातून स्त्रियांसमोरील या पेचाचा केंद्रबिंदू हा प्रामुख्याने 'मातृत्व आणि करियर' येथे पोचत असल्याचे दिसून आले आहे. हा विषय केंद्रबिंदू होण्याचे कारण अगदी उघडच आहे. एक तर, निसर्गाने मातृत्वाची जबाबदारी शारीरिक व मानसिकदृष्ट्या स्त्रीकडे सोपविली आहे; दुसरे म्हणजे, आपल्या अपत्याची वाढ सर्वार्थाने चांगली व्हावी यासाठी आपण 'वेळ देणे' गरजेचे आहे, ही जाणीव त्या सुशिक्षित स्त्रीच्या ठायी असतेच. शिवाय, वाढत्या महागाईच्या काळात, मुलांच्या शिक्षणाचा व कुटुंबाचा सर्व खर्च विचारात घेता आपल्याला नोकरी करणे आवश्यक आहे, हेही वास्तव तिच्या नजरेसमोरून हटत

नाही. ही झाली नोकरीची आर्थिक बाजू. पण नोकरीबाबत तिची मन:स्थिती द्विधा बनविणारी मानसिक बाजूही आहे. करियरच्या वाटेवरील आव्हाने व यशाच्या पायऱ्या खुणावत असताना त्यांचा त्याग करून घरी 'वेळ द्यावा लागणे', ही मानसिक ओढाताणदेखील आजच्या स्त्रियांना त्रासदायक ठरते आहे.

या सर्व बाबी लक्षात घेऊन मातृत्व रजा, अर्धपगारी रजा अशा काही सवलती कायद्याने स्त्रियांना देऊ केल्या आहेत. तरी या विषयाची आणखीही एक महत्त्वाची बाजू आहे. ती अशी की, या तिच्या त्रासात तिच्याबरोबरचे पुरुष सहकारी आणि तिच्या कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी वा मालकवर्ग यांचा, तिच्यावरील मातृत्वाच्या जबाबदारीमुळे तिच्या कार्यालयीन कामकाजाप्रती बदललेला दृष्टिकोणही तिला डाचत असतो. अशा परिस्थितीत करियर करावे की नाही, केल्यास करियर, घर व मूल अशी सर्व 'वेळ मागणारी' उद्दिष्टे कशी पूर्ण करावयाची, असे प्रश्न तिला पडतात. भारतासह, संपूर्ण जगातील स्त्रिया याच पेचात अडकल्या आहेत.

**तारेवरची कसरत सर्वत्र सारखीच!**

ब्रिटनमधील मध्यमवर्गातील स्त्रियांनाही या प्रश्नाला सामोरे जावे लागत आहे. हा प्रश्न तेथे इतका महत्त्वाचा ठरला/ठरतो आहे की अलीकडेच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांच्या वेळी 'आम्हा नोकरदार महिलांचा तारणहार कोणताच पक्ष नाही', असे म्हणून मतदान करावे की नाही, या विचारापर्यंत काही महिला पोचल्या होत्या. त्या वेळी ब्रिटनमधील 'न्यू स्टेट्स्वुमन' या नियतकालिकाने या प्रश्नाचा वेध घेतला होता. या मासिकाने एक प्रातिनिधिक उदाहरण घेतले आहे. इतिहास हा विषय घेऊन पदवीधर झालेली कॅरोलिना ही प्रसारमाध्यमात उच्चपदावर काम करणारी तडफदार तरुणी. लग्न झाल्यावरही आपल्या करियरला न्याय देणारी. गेल्या वर्षी तिला मुलगा झाला आणि तिचे करियर व मुलगा झाल्यानंतरचे सुखी कौटुंबिक जीवन यात मोठी तफावत निर्माण झाली. खरे तर, तिचे कौटुंबिक जीवन सुखी आहे आणि तिची नोकरीही टिकून आहे. मग तरी असे का व्हावे?

मुलाच्या जन्मानंतर मुलाला वेळ देता यावा म्हणून तिच्या कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कॅरोलिनाला आठवड्यातून फक्त चार दिवस काम करण्याची मुभा दिली आहे (मात्र, तिला देण्यात आलेल्या या सवलतीचा विसर तिचे सहकारी तिला पडू देत नाहीत). ज्या कंपनीत तिच्या चांगल्या कामामुळे ती ओळखली जात होती, त्याच कंपनीत आता तिच्याकडे वेगळ्या दृष्टिकोणातून बघण्यात येत असल्याने तिला

मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. दुसरीकडे, तिच्या पगारातील दोन-तृतीयांश भाग हा बालवाडीसाठी व मुलाला सांभाळणाऱ्या दाईच्या पगारासाठी खर्च होतो. आठवड्यातून चार दिवस काम करण्याच्या सुविधेमुळे तिला उपकाराच्या ओझ्याखाली दबल्यासारखे वाटते आणि या सवलतीमुळे इतर सहकाऱ्यांच्या मनामध्ये तिच्याबद्दल ईर्षा व मत्सर या भावना उफाळून येत आहेत, असे तिला जाणवते. कॅरोलिना ही मध्यमवर्गाचे प्रतिनिधित्व करणारी असून विशेषतः मध्यमवर्गीय महिलांना या मानसिक कोंडीला सामोरे जावे लागते. कारण, मध्यमवर्ग हा असा एक घटक आहे की बऱ्यापैकी सधन असल्याने सरकारी सोयी-सुविधांचा फायदा मिळावा अशी मागणी/अपेक्षा तो करू शकत नाही; आणि त्याच वेळी केवळ नवऱ्याच्या पगारात/ एकट्याच्या कमाईतून कुटुंबाचा खर्च भागवूही शकत नाही. म्हटले तर 'सर्व हक्क मिळालेला' आणि म्हटले तर 'दुःखी व खंतावलेला' अशी काहीशी विचित्र अवस्था या समाजगटाची झाली असते. त्यामुळे, आपण मुलांनाही नीट वेळ देऊ शकत नाही आणि नोकरीतही पूर्वीसारखा कामाला न्याय देऊ शकत नाही, अशी खंत या गटातील स्त्रियांना वाटत असते. कोणाची तरी सहानुभूति त्वरित मिळावी अशी या गटाची परिस्थिती नसली तरी खरे तर त्यांना ती मिळायलाही हवी आहे, असे म्हटले जात आहे. कारण, या गटातील स्त्रियांना विविध पदांवर चांगले काम करून दाखविण्याची संधी मिळाली असली तरी जे मिळविले त्यावर त्यांना आता पाणी सोडावे लागत आहे. मुलांना वेळ देता यावा आणि कार्यालयात होणारी घालमेल थांबावी, यासाठी अनेक स्त्रिया आता नोकऱ्या सोडून घरीच राहाण्याचा पर्याय नाईलाजाने स्वीकारत आहेत. या अशा सामाजिक व कौटुंबिक परिस्थितीमुळे 'आपल्याला १९५० च्या दशकात ढकलले जात असल्याची भावना' सध्या अनेक स्त्रियांच्या मनात घर करून आहे.

अलीकडच्या काळात या प्रश्नावर उत्तर शोधण्याच्या दृष्टीने काही सूचना करण्यात आल्या होत्या. उदाहरणार्थ, बाळंतपणासाठी असलेली रजा, पाळणाघरांची संख्या व पगार यात वाढ व्हावी इत्यादी. पण नोकरदार स्त्रियांची कार्यालयांमध्ये कॅरोलिनाप्रमाणे मानसिक कुचंबणा होऊ नये, यासाठी मात्र काहीही उपाय सुचविण्यात आलेले नाहीत. पालकांसाठी, विशेषतः कमी उत्पन्न गटातील पालकांसाठी, काही आर्थिक सोयी-सुविधाही सुचविण्यात आल्या होत्या. पण तो सगळा खटाटोप काही कारणाने यशस्वी होऊ शकला नाही. त्यामुळे, या समस्येचे उत्तर शोधणे ही एवढी सोपी गोष्ट नसल्याचे काहींचे मत बनले आहे. तरी अशी ही मंथनप्रक्रिया चालू राहिली

पाहिजे, असे अनेकांना वाटते. दरम्यान, यासंदर्भात मालकवर्गाने कर्मचाऱ्यांशी अधिक मैत्रीपूर्ण भावनेने वागण्याची आवश्यकता असल्याचे मत व्यक्त करण्यात आले आहे.

**मालक/'बॉस' म्हणतात...**

पीटर विल्बी या मालकाने या संदर्भात मांडलेल्या मतांमुळे या प्रश्नाची आणखी एक बाजू पुढे आली आहे. ते म्हणतात, "माझ्या पहिल्या मुलाचा जन्म झाला तेव्हा पितृत्व रजा नुकत्याच मंजूर करण्यात आल्या होत्या. एका आठवड्याची पितृत्वरजा घेणाऱ्या सुरुवातीच्या एक हजार नागरिकांमध्ये कदाचित माझा समावेश असेल. त्यानंतर तापाने आजारी पडल्याने मी आणखी सात दिवसांची रजा वाढवून घेतली होती. त्याच काळात मी कर्मचारी संघटनेचे काम करीत असल्याने, मातृत्व व पितृत्व रजा वाढवाव्यात, कामाच्या वेळा लवचिक असाव्यात, कामाच्या ठिकाणी पाळणाघरे असावीत, अशा अनेक मागण्या लावून धरण्यात माझा सहभाग होता. आता मी एका लघुउद्योगात असून मालक/बॉस या वर्गात गेलो आहे आणि त्याबरोबरच माझी मतेदेखील पालटली आहेत. व्यवसायात अनेकदा डोकावणाऱ्या काही अकस्मात अडचणींना सामोरे जाताना एखाद्या कर्मचाऱ्याचे लहान मूल, आजारी पती/पत्नी आणि वृद्ध माता-पिता हे चित्र डोळ्यासमोर नकोसे वाटते. विशेषतः, प्रसारमाध्यमांमध्ये काही दिवस/आठवडे हे अधिक महत्त्वाचे ठरतात. पण ते नेमके कोणते असतात हे आधीपासून सांगता येत नाही. कामावर कोणत्याही कर्मचाऱ्याची गरज केव्हाही भासू शकते. अशा वेळी रजा त्या कर्मचाऱ्यास रजा मंजूर केलेली असली तर फार अडचणीची स्थिती निर्माण होते. काहीही असले तरी १९७०च्या दशकाच्या तुलनेत आता स्त्रियांना करियर करणे सुलभ झाले असावे (?); तरी मातृत्व व करियर यांची सांगड घालणे अडचणीचे ठरते. कारण, आजच्या स्पर्धेच्या युगात अपत्याला जन्म देण्याचे वय आणि करियर करण्याचे वय हे साधारणपणे एकच येते. स्त्री व पुरुष या दोघांनाही हे लागू होते, त्यामुळेच अधिकाधिक पुरुष अपत्यसंगोपन व घरकामांत स्त्रियांना मदत करताना आढळतात. शिवाय अपत्य संगोपनाचा खर्च व संबंधित आव्हाने वाढल्यानेही अनेक जण करियर आधी व मूल नंतर असा निर्णय घेतात. या परिस्थितीत पाळणाघरांची संख्या वाढणे तसेच सरकार व कंपन्यांची धोरणे कुटुंबांप्रती अधिक सौम्य व स्नेहपूर्ण असणे गरजेचे आहे."

पीटर विल्बीच्या या प्रतिपादनाचा काय व कसा प्रतिवाद करावा?

*(संदर्भ - न्यू स्टेट्स्वुमन -एप्रिल २००५, द इकॉनॉमिस्ट -४जून २००५)*

# हानिकारक सौंदर्यप्रसाधने!

'सौंदर्य हे पाहणाऱ्याच्या डोळ्यांत असते' किंवा 'मानसिक सौंदर्य हेच खरे सौंदर्य', असे ज्यांनी म्हणून ठेवले आहे त्यांनी, सौंदर्याचा आणि सौंदर्यप्रसाधनांचा आजचा बाजार पाहिला असता तर कदाचित वेगळे मत व्यक्त केले असते! अर्थात सौंदर्याचे महत्त्व आहेच आणि सौंदर्य कोणाला नको का असते ? पण, अलीकडे सुंदर दिसण्याच्या सोस एवढा वाढला आहे की, त्यासाठी कृत्रिम सौंदर्यप्रसाधनांवर हजारो रुपये खर्च करण्यात येत आहेत. यात नट-नट्या, उच्चभ्रू तसेच उच्च-मध्यम व मध्यमवर्गातील तरूण-तरुणी, स्त्री-पुरुष अशा सर्वांचाच सहभाग आहे. ग्राहकांच्या या मानसिकतेचा फायदा उठवत विविध कंपन्यांच्या विविध उत्पादनांनी नटलेली सौंदर्यप्रसाधनांची बाजारपेठ ही आज अब्जावधी रुपयांवर पोचली आहे. गंमत अशी की, सौंदर्यवृद्धीसाठी वापरण्यात येणारी कृत्रिम सौंदर्यप्रसाधने सौंदर्य तात्पुरते वाढवित असली तरी दीर्घकालाचा विचार करता ती मानवी शरीराला हानिकारक असल्याचे अभ्यासकांना आढळले आहे. केवळ इतकेच नाही तर, ती पर्यावरणाचेही मोठे नुकसान घडवून आणतात, असेही निदर्शनास आले आहे.

पर्यावरणाची हानी करणाऱ्या विविध बाबींचा अभ्यास करणाऱ्या 'एन्व्हायर्नमेंटल वर्किंग ग्रुप'ने यासंदर्भात सुमारे साडे सात हजार सौंदर्यप्रसाधनांची पाहणी केली. यात आंतरराष्ट्रीय पातळीवरील नामवंत कंपन्यांच्या सौंदर्यप्रसाधनांचाही समावेश होता. अनेक रासायनिक घटक वापरून ही सौंदर्यप्रसाधने तयार करण्यात येतात. या पाहणीनुसार, एक-तृतीयांश सौंदर्यप्रसाधनांमध्ये कॅन्सरशी संबंधित असलेले घटक आहेत. ७० टक्के उत्पादनांमध्ये अन्य हानिकारक घटक आहेत आणि ५० टक्के उत्पादनांमध्ये त्वचेमध्ये खोलवर झिरपून रक्तवाहिन्यांमध्ये प्रवेश करू शकणारा असा 'पेनिट्रेशन एन्हान्सर्स' हा घटक आहे. सर्वच्या सर्व सौंदर्यप्रसाधने व त्यामधील सर्व घटकांचे आरोग्यावर वाईटच परिणाम होतात, असा संबंध अद्याप पूर्णपणे प्रस्थापित झालेला नाही. मात्र, काही घटकांचा अनिष्ट परिणाम होतो, असे आढळले आहे. सध्याच्या

जगात कृत्रिमतेला महत्त्व आल्याने या उत्पादनांचे गुणधर्म वाढवून सांगितले जात असले, तरी यांतील घटकांचा धोका ग्राहकांनी लक्षात घेतला पाहिजे, असे अभ्यासकांना वाटते. कृत्रिम, आधुनिक व लोकप्रिय सौंदर्यप्रसाधनांचा विचार केला तर प्राथमिक अंदाजानुसार एखादी व्यक्ती किमान १२६ वेगवेगळ्या घटकांच्या संपर्कात येत असते. हे घटक मानवी त्वचेला अपायकारक आहेत किंवा कसे हे त्यांच्या वापरामुळे त्वचेवर रॅश येतो का, त्वचा लालसर होते का, अशा काही किरकोळ चाचण्यांद्वारे बघण्यात येते. पण दीर्घकाळाच्या वापरानंतर त्यांचे मानवी शरीरावर व पर्यावरणावर कोणकोणते परिणाम होऊ शकतात, हे मात्र तपासले जात नाही.

शाम्पू किंवा हाताला लावायचे क्रीम या अधिक प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या उत्पादनांमध्ये, एखादा विशिष्ट घटक हाच मुळी त्याचा आधारभूत वा मुख्य घटक असतो आणि तो जास्त प्रमाणात वापरलेलाही असतो. असा हा मुख्य घटक शरीरात शोषला जाऊन तो शरीरातील मेद पेशींमध्ये अथवा मेंदू, यकृत, मूत्रपिंड, किंवा जननेंद्रियांमध्ये साठून राहू शकतो. सौंदर्यप्रसाधनांच्या या संभाव्य दुष्परिणामांबाबत हा अवाजवी बाऊ केला जातो, असे उत्पादक कंपन्या म्हणत असल्या तरी संबंधित संशोधकांना आरोग्याला हानिकारक घटक त्यांत सापडले आहेत. उदाहरणार्थ - फ्थॅलेट्स् (phthalates) हा घटक स्तनांच्या कर्करोगाशी संबंधित असल्याचे आढळले; तर सुवासासाठी वापरला जाणारा मस्क झायलिन हा घटक शरीरातील संप्रेरकांचे (हॉर्मोन्सचे) संतुलन बिघडवतो. सौंदर्यप्रसाधनांमध्ये वापरल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या सुवासिक घटकांमुळे दम्याचा त्रास वाढतो; आणि ज्यांना दम्याचा विकार नाही अशांनाही तो होऊ शकतो.

डिटर्जन्ट्स् असलेल्या शाम्पूमध्ये डोळ्यांशी संबंधित असलेल्या काही नाजूक पेशींची हानी होते, असे संशोधकांनी म्हटले आहे. हेअर डायमधील घटकांचा संबंध मूत्राशयाचा कर्करोग आणि रक्ताचा कर्करोग याच्याशी असल्याचे निदर्शनास आले आहे. अभ्यासक म्हणतात की, हेच घटक जर काही औषधांमध्ये असते तर ती औषधे बाजारातून माघारी बोलविण्यात आली असती किंवा स्वतंत्ररीत्या असे संशोधन करणाऱ्या संशोधकांना संशोधनासाठी निधी तरी उपलब्ध करून देण्यात आला असता. पण सौंदर्यप्रसाधनांचे वाढते आकर्षण आणि त्यांचे योग्य मूल्यमापन करून बरेवाईट परिणाम समजून घेण्याबाबत असलेली उदासीनता लक्षात घेता ही उत्पादने तशीच विक्रीसाठी बाजारात आणली जातात, असे दिसून येते.

पर्यावरणाचा अभ्यास करणारेही सौंदर्यप्रसाधनांबाबत अशाच प्रकारचे मत व्यक्त करीत आहेत. काही विशिष्ट औषधे पाण्याचे साठे दूषित करीत आहेत त्याप्रमाणेच सौंदर्यप्रसाधनांमधील काही घटकांमुळेही पाणी दूषित होत असल्याचे त्यांना आढळले. धुतली गेलेली सौंदर्यप्रसाधने सांडपाण्यात मिसळली जातात. हे विशिष्ट रासायनिक घटक वेगळे काढून दूर करण्याचे तंत्रज्ञान सांडपाण्यावर प्रक्रिया करणाऱ्या संबंधित यंत्रणेच्या विभागाजवळ नसते. त्यामुळे सांडपाण्याद्वारे ती नजीकच्या पाण्याच्या साठ्यात प्रवेश करतात. या रसायनांचे पाण्यातील जैविक साखळीवर कोणते दीर्घकालीन परिणाम होतात याचा अभ्यास झालेला नाही. तसेच या पाणीसाठ्यांतून हे घटक मानवी शरीरात पोचून त्याचे शरीरावर काय परिणाम होतात हेदेखील स्पष्ट झालेले नाही. एकंदरीत पाहता, 'सब गोलमाल है' या शब्दांत सौंदर्यप्रसाधनांचे वर्णन करता येईल.

आता प्रश्न असा आहे की यासंदर्भात सरकारी यंत्रणांची भूमिका काय आहे? सौंदर्यप्रसाधनांच्या उत्पादक कंपन्यांवर कोणतीच बंधने नाहीत काय ? या उत्पादनांची तपासणी केली जाते किंवा नाही ? सौंदर्यप्रसाधनांच्या परिणामांबाबत अलीकडील दोन-तीन वर्षांपर्यंत एवढी जागरूकता नव्हती. आता मात्र काही अभ्यासकांनी हा विषय लावून धरल्याने काही नागरिक जागरूक झाले आहेत. ग्राहकांनी व पर्यावरणतज्ज्ञांनी या विषयावर आवाज उठविल्यानंतर अमेरिकेच्या अन्न व औषध प्रशासन विभागाला सक्रिय होणे भाग पडले. मार्च २००५ मध्येच या विभागाने सौंदर्यप्रसाधनांच्या उत्पादक कंपन्यांना इशारा दिला की, या कंपन्यांनी आपली उत्पादने 'संपूर्ण सुरक्षित असल्याचे सिद्ध झालेले नाही,' असे ग्राहकांना सांगितले पाहिजे. उत्पादक कंपन्यांनी असे केले नाही तर विभागाला कायद्याचा बडगा उगारावा लागेल.

पण हा बडगा उगारला जाईल किंवा कसे याबाबत साशंकता आहे. कारण जर असे झाले तर अमेरिकेतील ९९ टक्के उत्पादनांवर ग्राहकांसाठी वर उल्लेखित सूचना छापावी लागेल. हे 'जर' व 'तर' फार महत्त्वाचे आहे. कारण, या विभागाने आतापर्यंत याकडे कानाडोळा केलेला आहे. याचे गुपित म्हणजे या उत्पादक कंपन्यांची बाजारपेठ जगभरात विस्तारलेली असून त्यांना यातून मिळणारा नफा जास्त आहेच, शिवाय अनेकांना त्यांतून रोजगारही मिळाला आहे. यामुळे या गटाकडे राजकीय शक्तीदेखील आहे. त्यामुळे या गटावर गुरकावण्याऐवजी या विभागाने त्यांच्यावर कृपाच केली. यापूर्वी 'कॉस्मेटिक्स इनग्रेडिएंट रिव्ह्यू'ने यासंदर्भात मांडलेली सुरक्षिततेचीच बाजू या विभागाने वर उचलून धरली होती. ही संस्था स्वायत्त आहे वा उद्योगांवर विशेष लक्ष

ठेवणारी आहे, असे भासविले गेले तरी खरी कहाणी वेगळीच होती. वास्तविकत: या संस्थेला सौंदर्यप्रसाधनांच्या उत्पादक कंपन्याच निधी पुरवत होत्या व आपला कार्यभाग साधून घेत होत्या. तरीदेखील अमेरिकेचा अन्न व औषध विभाग, 'ही उत्पादने सुरक्षित आहेत' अशा, त्याच संस्थेने दिलेल्या हवाल्यावर, विसंबून होता.

एक लक्षात घेण्यासारखी बाब अशी की, युरोपीय युनियननेदेखील 'कॉस्मेटिक्स इनग्रेडिएंट रिव्ह्यू' या संस्थेचे म्हणणे ग्राह्य धरले होते. कारण, जगभरात कोठेही सौंदर्यप्रसाधने विक्रीला जाण्याआधी त्याला विशिष्ट यंत्रणेची मान्यता अशी लागत नाही. गंमत म्हणजे 'कॉस्मेटिक्स इनग्रेडिएंट रिव्ह्यू' या संस्थेने गेल्या ३० वर्षांत १० हजार ५०० सौंदर्यप्रसाधनांपैकी फक्त ११ टक्के सौंदर्यप्रसाधनांचाच अभ्यास केला आहे. म्हणजे एकुणांतील ८९ टक्के सौंदर्यप्रसाधनांमधील घटकांची तपासणी झालेलीच नाही. गेल्या तीन दशकांत फक्त नऊ उत्पादनांमधील घटकांवर बंदी घालण्यात आली आहे. आता युरोपीय युनियन या सर्व घडामोडींकडे लक्ष ठेवून आहे. ब्रिटनमध्येदेखील अशीच ढिसाळ परिस्थिती आहे. अशा परिस्थितीत आपल्या आरोग्यासाठी आता ग्राहकांनीच खडबडून जागे होण्याखेरीज पर्याय नाही!

## सौंदर्यप्रसाधनांमधील घटकांमुळे शरीरावर होणारे परिणाम

| घटक | घटकाची उपयुक्तता | घटकाचे वाईट परिणाम |
|---|---|---|
| पॅराफिनम | लुब्रिकंट इमोलंट | हे एक खनिज तेल, हा स्वस्त घटक लिक्विडम त्वचेत तात्पुरती आर्द्रता निर्माण करतो. वापर वाढल्यास त्वचेची नैसर्गिकता तैलियता कमी होऊन त्वचा कोरडी पडते. |
| पेग-१५० | थिकनर, सॉल्व्हंट, इमल्सिफायर व सर्फक्टंट | त्वचेत खोलवर जाण्याची क्षमता, त्वचेस त्रासदायक, स्तनांच्या कर्करोगाला कारणभूत |
| मिथाइलपॅराबेन, ब्युटाइलपॅराबेन, इथाइलपॅराबेन, आयसोब्युटाइलपॅराबेन, प्रोपाइलपॅराबेन | प्रिझर्व्हेटिव्ह्ज् | त्वचेला त्रासदायक, पॅराबेन्समुळे स्त्री-शरीरातील इस्ट्रोजेनमध्ये वाढ होऊन ती स्तनांच्या कर्करोगाला कारणभूत ठरते. गर्भाच्या वाढीवरही ती अनिष्ट परिणाम घडवून आणते. |

(पुढील पानावर)

(मागील पानावरून) **सौंदर्यप्रसाधनांमधील घटकांमुळे शरीरावर होणारे परिणाम**

| घटक | घटकाची उपयुक्तता | घटकाचे वाईट परिणाम |
|---|---|---|
| सायमिथिकोन | सिंथेटिक मॉइश्चरायझर, फिल्म फॉर्मर | त्वचा चुरचुरणे, खाजणे. फिल्म फॉर्मर्स व इतर काही घटक हे त्वचेवर आवरण निर्माण करत असल्याने त्वचेला मोकळे वारे लागत नाही. घाम बाहेर पडण्यात अडथळा निर्माण होतो व त्वचा चुरचुरते. |
| बीएचटी | अँटीऑक्सिडंट | ॲलर्जीला निमंत्रण ठरू शकते. कार्सिनोजेनिक, गर्भाला हानिकारक |
| पारफम | फ्रॅग्रन्स (सुवास) | दम्याचा विकार वाढण्यास कारणभूत, त्वचा चुरचुरणे खाजणे इ. मध्यवर्ती मज्जासंस्थेस हानिकारक, हॉर्मोनचे असंतुलन. |
| लिमोनेन | सिंथेटिक फ्रॅग्रन्स (कृत्रिम- सुवास) | माशा मारण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कीटकनाशकांतील घटक, डोळे व त्वचा चुरचुरणे, दम्याचा विकार बळावणे. |
| गेरॅनियॉल | सिंथेटिक फ्रॅग्रन्स (कृत्रिम- सुवास) | डोळे व त्वचा चुरचुरणे. |
| लिनालोल | सिंथेटिक फ्रॅग्रन्स (कृत्रिम- सुवास) | डोळे, त्वचा व श्वसनमार्गासाठी हानिकारक. मांसपेशीनाही हानिकारक |
| हायड्रोसिट्रोनेलाल | सिंथेटिक फ्रॅग्रन्स (कृत्रिम- सुवास) | डोळे, त्वचा, फुफुस्से, श्वसनमार्गासाठी हानिकारक. मांसपेशीनाही हानिकारक |
| ब्युटिलफेनाइल मिथाइलप्रोपियॉनल | सिंथेटिक फ्रॅग्रन्स (कृत्रिम- सुवास) | त्वचा चुरचुरणे, खाजणे इ. मध्यवर्ती मज्जासंस्थेस हानिकारक. |

*(संदर्भ - द इकॉलॉजिस्ट - जून २००५)*

## शिक्षण

# हवे सबलीकरण विद्यापीठीय शिक्षणाचे

'लोकसंख्या' आणि 'मनुष्यबळ' या दोन गोष्टींत मूलभूत फरक आहे. एखाद्या देशाची प्रचंड प्रमाणात असणारी लोकसंख्या हीच त्या देशाचे तितकेच बुलंद मनुष्यबळही आहे, असे सरसहा अनुमान काढता येत नाही. तसे ते काढणे हे केवळ अयोग्यच नाही तर चुकीचेही ठरते. 'संख्ये'चे रूपांतर 'बळा'त आणि त्याही पुढे जाऊन त्या बळाचे परिवर्तन 'भांडवला'त करण्यासाठी जाणीवपूर्वक आणि डोळसपणे गुंतवणूक करावी लागते. भारतही यास अपवाद नाही. या ठिकाणी 'शिक्षण' या जीवनांगाची भूमिका निर्णायक ठरते. साहजिकच, कोणत्याही देशाचे शिक्षणविषयक धोरण मग अशा रूपांतरण प्रक्रियेत केंद्रवर्ती बनते. विशेषतः, २०२० सालापर्यंत उभ्या जगाचे आघाडीचे ज्ञानकेंद्र बनण्याची क्षमता (आणि ऊर्मीही!)ठायी बाळगणारा देश म्हणून ज्या भारताकडे पाहिले जाते त्या लोकसंख्याबहुल अशा या देशाचे 'मनुष्यबळ' हेच जर या प्रवासातील मुख्य साधन असेल तर त्या साधनाचे 'भांडवला'त रूपांतर करण्यासाठी शिक्षणाच्या सुविधांचा पुरेसा विस्तार तसेच गुणवर्धन होणे अनिवार्यच ठरते. खासकरून उच्च शिक्षणाच्या व्यवस्थेचे. कारण, माहिती-तंत्रज्ञानासारख्या 'नॉलेज इंडस्ट्री'त आघाडी प्रस्थापित करून त्रिखंडात झेंडा फडकविण्याचे स्वप्न पाहताना देशांतर्गत उच्च शिक्षणाचा विस्तार आणि प्रसार घडवून आणणारी यंत्रणा आणि तिची गुणवत्ता अव्वल राखावीच लागेल. भारतातील प्रचलित विद्यापीठीय शिक्षणव्यवस्थेची आजमितीस विविध व्यासपीठांवरून सुरू असलेली चिकित्सा या संदर्भात महत्त्वाची ठरते.

वाराणसी येथील बनारस हिंदू विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र तसेच 'मॉलेक्यूलर ॲन्ड ह्यूमन जेनेटिक्स' विभागातील अभ्यासक-प्राध्यापक एस. सी. लखोटिया यांनी 'करंट सायन्स'या नियतकालिकाच्या अलीकडील अंकात या विषयाचा घेतलेला औरसचौरस धांडोळा विलक्षण विचारप्रेरक आहे. एकूणच विद्यापीठीय शिक्षणप्रणाली, विद्यापीठांना उपलब्ध होणारा निधी, विद्यापीठे तसेच महाविद्यालयांमधील विद्यमान शैक्षणिक सुविधा, अशा सुविधांची गुणवत्ता, विद्यापीठीय शिक्षणाकडे वळणारे विद्यार्थी, या क्षेत्रात कार्यरत असणारा अध्यापक चमू, विद्यापीठे तसेच महाविद्यालयांमधील

एकंदर शैक्षणिक पर्यावरण यांसारख्या नानाविध पैलूंना स्पर्शणारे हे विवेचन जितके व्यापक तितकेच प्रातिनिधिक आहे.

व्यावसायिक अभ्यासक्रमांकडे आजच्या तरुणांचा असणारा वाढता ओढा आणि त्यापायी विद्यापीठीय चौकटीतील उच्च शिक्षण घेऊन अध्यापन-संशोधनास जीवनध्येय बनविण्याबाबत गुणवान विद्यार्थ्यांमधील ढासळता कल, ही या संदर्भातील आजची मुख्य समस्या आहे, याबाबत फारसे दुमत होणार नाही. या प्रक्रियेचे होणारे दुष्परिणाम हे दुहेरी आहेत. एक तर, त्यामुळे विद्यापीठांमधून साकारणाऱ्या संशोधनाचा, शोधनिबंधांचा दर्जा खालावतो. संशोधन तसेच अध्यापनाला वाहून घेतलेल्यांची संख्या घसरू लागते आणि याच संशोधकांमधून निर्माण होणाऱ्या भावी अध्यापकांची संख्या रोडावल्याने (कालांतराने) 'अध्यापन' या विषयाचीच गोडी असणाऱ्या गुणवान, होतकरू व्याख्याते-अध्यापकांचा विद्यापीठे-महाविद्यालयांमध्ये तुटवडा जाणवू लागतो. त्याचा परिणाम अध्यापनाच्या गुणवत्तेवर होतो आणि पुन्हा चांगले हुषार, भरपूर क्षमता असणारे विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमांकडेच आपली पावले वळवतात.

व्यावसायिक अभ्यासक्रमांचे हुषार विद्यार्थ्यांना असणारे आकर्षण जबरदस्त असते. अशा अभ्यासक्रमांना प्रवेश नाहीच मिळाला तर मग ते विद्यार्थी पठडीतील विषयांच्या अभ्यासासाठी विद्यापीठीय उच्च अभ्यासक्रमांची निवड करतात. अशा विद्यार्थ्यांचे स्वागत करणारे विद्यापीठे अथवा महाविद्यालयांमधील वातावरण कसे असते ?... तोचतोच अभ्यासक्रम रसहीनपणे, अध्ययनाची गोडी वाढूच नये अशा पद्धतीने शिकविण्याचा खाक्या, महाविद्यालयांमधील अंधारे वर्ग, रंग उडालेल्या भिंती, वापरण्यास अयोग्य बनलेल्या उपकरणांनी भरलेल्या प्रयोगशाळा अशा उदासवाण्या वातावरणात विद्यार्थ्यांचा हुरूप कसा टिकून राहावा?

वर्गात शिकविणारे अध्यापक हे विद्यापीठीय तसेच महाविद्यालयीन उच्च शिक्षणपद्धतीचे एक अतिशय महत्त्वाचे अंग. परिणामी, शिक्षणव्यवस्थेच्या या घटकाची मानसिकता कशी आहे, त्याच्याकडे सोपविलेल्या कामाकडे पाहण्याचा त्याचा दृष्टिकोण कसा आहे, या घटकाच्या ठायी असणाऱ्या व्यावसायिक कौशल्यांचा दर्जा कशा प्रकारचा आहे यांसारख्या बाबींवर खूप काही अवलंबून आहे. अध्यापनाच्या प्रबळ प्रेरणेपायीच उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात उतरणाऱ्यांचे आज शेकडा प्रमाण किती आहे ? परदेशांतील विद्यापीठातून डॉक्टरेट मिळवून भारतात परतलेल्या संशोधकांची पहिली पसंती असते ती देशातील आघाडीच्या संशोधन संस्थांमधील संधींना. अशा संस्थांमधे

प्रवेश करणे जमलेच नाही तर मग त्यापैकी काही विद्यापीठे अथवा महाविद्यालयांकडे वळतात. अशा नवअध्यापकांचा उत्साह टिकून राहावा असे तरी शैक्षणिक पर्यावरण त्यांना या व्यवस्थेत मिळते का? स्वतंत्र संशोधनाची आवड आणि क्षमता असणारे हे तरुण संशोधक-अध्यापक अध्यापन आणि संशोधन या दोहोंचा मेळ घालण्याच्या प्रयत्नात साहजिकच असतात. परंतु, अशा उत्साही अभ्यासकांना त्यांच्या आवडीच्या विषयांत स्वतंत्र संशोधन करण्यासाठी जर काही बीज भांडवलाची जरूरी भासली तर अशा बीज भांडवलाची विद्यापीठांकडे वानवाच असते.

उच्च शिक्षणाच्या क्षेत्राला जाणवणारी निधीची चणचण ही तर मोठीच अडचण आहे. विद्यापीठे तसेच महाविद्यालयांची संख्या वाढतेच आहे. या वाढत्या विस्ताराला भासणारी पैशाची वाढती गरज भागविण्याइतपत लवचिकता मात्र निधीच्या स्त्रोतांत नाही. परिणामी, विद्यापीठ अनुदान आयोगासारख्या यंत्रणेकडून जो काही अर्थपुरवठा होतो तो पूजेनंतरच्या अल्पस्वल्प खिरापतीप्रमाणे प्रत्येक विद्यापीठाच्या वाट्याला येतो. त्यातून किमान गरजांचीच तोंडमिळवणी कशीबशी होते. परिणामी, उपलब्ध सुविधांमध्ये भर घालणे, प्रयोगशाळांमध्ये नवनवीन उपकरणे घेणे यांसारख्या बाबींना बव्हंशी महाविद्यालयांना मुरडच घालावी लागते. विद्यापीठांतील निरनिराळ्या संशोधन विभागांनी स्वत:च्या उपक्रमशीलतेद्वारे संशोधन प्रकल्प विकसित करून काही क्षेत्रांत संशोधन हाती घ्यावे, अशीही भूमिका आताशा व्यक्त केली जाते. परंतु, हा पर्यायही नवसंशोधकांच्या ठायी असणाऱ्या संशोधन ऊर्मीला खतपाणी घालेलच याची हमी नाही.

एक तर, अशा संस्थांची कार्यपद्धती अतिशयच वेळखाऊ असते. संशोधन प्रकल्पाचा प्रस्ताव मंजूर होण्यातच अगणित दिवस खर्ची पडतात. मंजूर प्रकल्पांचे अर्थसाहाय्यही वेळापत्रकानुसार वेळेवर मिळेलच याची खात्री नसते. परिणामी, आखीवरेखीव कार्यक्रमाप्रमाणे प्रकल्प पुढे सरकत नाही. तात्पुरती सोय म्हणून संबंधित विद्यापीठ अथवा महाविद्यालयही उचल देत नाही. त्यातून संशोधनाचे काम रेंगाळते, ठप्प होते. दप्तरदिरंगाईपायी संशोधकांना महिनोनमहिने मेहनतानाही मिळत नाही. अशा परिस्थितीत दर्जेदार आणि समाजसन्मुख संशोधन या व्यवस्थेतून साकारेल अशी अपेक्षा कितपत धरता येईल?

या पर्यावरणात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणणे, संपूर्ण विद्यापीठीय शिक्षणव्यवस्थेचेच सबलीकरण हाती घेणे, हेच या दुखण्यांवरील औषध आहे, असे प्रतिपादन लखोटिया करतात. अशा सबलीकरणाची त्यांनी मांडलेली पंचसूत्री या

विषयाबाबत आस्था असणाऱ्या सर्वच संबंधितांच्या विचारप्रक्रियेला चालना देणारी ठरावी. ही पाच सूत्रे अशी आहेत:

● व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या निवडीचे दडपण बालपणापासूनच मुलांच्या मनांवर आणले जाऊ नये यासाठी पालकांचे प्रबोधन करण्यावर भर देणे. केवळ इतकेच नाही तर, शालेय जीवनापासूनच मूलभूत शास्त्रे, अशा शास्त्रांमधील पायाभूत संशोधन यांबद्दल मुलांमध्ये जिज्ञासा आणि आवड निर्माण व्हावी यासाठी शिक्षकांनीही त्यांना प्रेरणा द्यावी असे काही शालेय विद्याविश्वातच करता येईल का याबद्दलही मंथन होण्याची गरज आहे.

● विद्यापीठीय शिक्षणव्यवस्थेत विविध स्तरांवरील अध्ययनादरम्यान विद्यार्थ्यांमध्ये समग्र दृष्टी तयार व्हावी, यासाठी आंतरविद्याशाखीय शिक्षणप्रणालीस चालना देणे. अभ्यासक्रमांची रचना, विषयांची निवड यांबाबत आज विद्यमान असणाऱ्या कप्पेबंद, पोलादी चौकटीची उपयुक्तता आणि बदलत्या शैक्षणिक वातावरणातील तिची प्रस्तुतता मुळापासूनच तपासून पाहण्याची गरज आहे.

● विद्यापीठीय उच्च शिक्षण, विशेषतः, पदव्युत्तर तसेच डॉक्टरेटच्या पदवीसाठी केले जाणारे अध्ययन-संशोधन यांच्या संख्यात्मक विस्तारापेक्षाही, अथवा, संख्यात्मक विस्ताराबरोबरीनेच गुणवत्ता वाढविणे-टिकविण्यावर कटाक्ष राखणे. त्या संदर्भातील गुणवत्तेचे निकष अधिक कठोर बनविणे.

● अध्ययनाबाबत आस्था असणारे तरुण अभ्यासक-संशोधक विद्यापीठीय तसेच महाविद्यालयीन शिक्षण व्यवस्थेकडे आकर्षित व्हावेत यासाठी विद्यापीठीय अध्यापन (सर्वच दृष्टींनी) अधिक आकर्षक बनविणे. अध्यापनाची सांगड संशोधनाशी बसावी अशी कार्यप्रणाली तयार करणे. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात स्वेच्छानिवृत्ती योजना राबवून नवीन रक्ताला वाव देण्यासाठी लवचिक, प्रेरक अशी नेमणूक व्यवस्था तयार करणे.

● विद्यापीठे आणि विशेषत्वाने महाविद्यालयांना पाणी, वीज, प्रयोगशाळा, इंटरनेटसारख्या सुविधेसह सुसज्ज अशी ग्रंथालये आणि मुख्य म्हणजे गुणवत्तेचे संगोपन करण्यास पुरेशा निधीचे शिंपण पुरविणे.

लखोटिया यांनी मांडलेल्या या पंचसूत्रीवर शिक्षणक्षेत्रात निदान व्यापक मंथन सुरू झाले तरी बरेच काही साध्य होऊ शकेल.

*(संदर्भ: करंट सायन्स, जून २००५).*

# काळा (की कार्बन?) पैसा

निसर्गाच्या बदलत्या ताळतंत्राचा आणि पृथ्वीच्या वाढत्या तापमानाचा संबंध असल्याचे मत संबंधित तज्ज्ञांकडून मांडण्यात आले आहे. तसेच, पृथ्वीच्या वाढत्या तापमानास औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेतून वातावरणात प्रवेश करणारे विविध वायू - विशेषत्वाने कार्बन डायॉक्साइड- कारणभूत ठरतात, असेही स्पष्ट झाले आहे. त्यामुळे वातावरणात असे वायू प्रवेश करू नयेत, यासाठी विविध देशांनी एकत्र येऊन 'क्योतो प्रोटोकॉल'ला तत्वतः मान्यता दिली व त्यानुसार वातावरणातील विविध हानिकारक वायूंचे प्रमाण- विशेषतः, कार्बन डायॉक्साइडचे- प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने पावले उचलण्यात आली. अमेरिकेने 'क्योतो प्रोटोकॉल'प्रमाणे कोणतीही कृती तर केली नाहीच; उलट, पर्यावरणाचे रक्षण करण्याऐवजी पर्यावरणाचे नुकसान करणारी धोरणेच अमेरिका आखते आहे, असे दिसते.

वातावरणातील कार्बन डायॉक्साइडचे प्रमाण वाढविणाऱ्या अशा कोळशावर आधारित (औष्णिक ऊर्जा) ऊर्जा प्रकल्पांची संख्या वाढविण्याचा निर्णय अमेरिकेने घेतला आहे. त्याद्वारे औष्णिक ऊर्जेचे प्रमाण २५ टक्क्यांनी वाढविण्याचे अमेरिकेचे उद्दिष्ट आहे. 'कोळसा या नैसर्गिक साधनस्रोताचे वरदान अमेरिकेला मिळाले नसते, तर अमेरिकेला ऊर्जेची चणचण भासली असती व त्यामुळे ती महागही झाली असती,' असे विधान अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉर्ज बुश यांनी राष्ट्रीय ऊर्जा धोरण ठरविताना केले होते. अमेरिकतील एकूण वीजनिर्मितीपैकी ५२ टक्के वीजनिर्मिती ही औष्णिक ऊर्जा या गटात मोडणारी आहे. दरम्यान, या धोरणाला साहाय्य करण्यासाठी प्रशासनाने कोळसा उत्पादनास अनुदान देण्याचे ठरविले आहे.

अमेरिकेच्या या भूमिकेमुळे पर्यावरणाचे अभ्यासक चिंतेत पडले आहेत. अमेरिकेच्या या कृतीमुळे, 'क्योतो प्रोटोकॉल'वर आधारित पर्यावरण रक्षणाच्या आतापर्यंत पुढे गेलेल्या कामावर पाणी पडेल, असे मत डेव्ह हॅमिल्टन या अभ्यासकाने व्यक्त केले आहे. औष्णिक ऊर्जेच्या एका प्रकल्पातून साधारणतः ३७ लाख टन कार्बन डायॉक्साइड वातावरणात प्रवेश करतो. म्हणजे १६ कोटी १० लाख झाडे कापल्यामुळे

पर्यावरणाची जेवढी हानी होईल तेवढी हानी एका प्रकल्पामुळे होईल. शिवाय या एका प्रकल्पातून १० हजार टन सल्फर डायॉक्साइड, १० हजार २०० टन नायट्रोजन ऑक्साइड, ७७.१ किलोग्रॅम पारा (मर्क्युरी) आणि १०२.१ किलोग्रॅम आर्सेनिक बाहेर पडेल. या सर्व घटकांमुळे पर्यावरणाचे व मानवी समाजाचे फार मोठे नुकसान होणार आहे. कोळशाच्या खाणींमुळे अमेरिकेतील नद्यांमधील सुमारे १९ हजार ३१२ किलोमीटर्सच्या क्षेत्रातील पाणी प्रदूषित झाले आहे, असे अमेरिकेतील 'ब्यूरो ऑफ माइन्स'ने स्वतःच मान्य केले आहे.

मग असा प्रश्न साहजिकच उभा राहतो की, अमेरिका पर्यावरणाची हानी करणारी धोरणे का आखते आहे ? याचे उत्तर असे की, तेथे 'कोळसा' हा राजकीयदृष्ट्या 'वजनदार' आहे. इंडियाना येथील 'ब्लॅक ब्युटी कोल' या कंपनीचे प्रमुख कार्यकारी अधिकारी स्टीव्हन चान्सलर हे अमेरिकेच्या ऊर्जा विभागाचे एक सल्लागार आहेत. या कंपनीची पालक-कंपनी असणाऱ्या कंपनीचे उपाध्यक्ष जॉन वूटन हेदेखील अमेरिकी ऊर्जा विभागाच्या सल्लागार मंडळावर असून त्यांनी 'क्योतो प्रोटोकॉल'वर टीका केली होती.

अमेरिकेच्या प्रशासन विभागाची भूमिका यांसदर्भात 'निव्वळ उक्ती, शून्य कृती', अशी आहे. कोळसा हा पर्यावरणाला आव्हान निर्माण करतो, हे प्रशासनाने मान्य केले आहे; म्हणून पर्यावरणाची हानी न करणाऱ्या तंत्रज्ञानासंबंधीच्या संशोधनाला निधी उपलब्ध करून देण्याचे धोरण त्यांनी स्वीकारले आहे. पण येथेही गंमतच आहे. हा निधी सौरऊर्जा किंवा वायूऊर्जा या पर्यायांसंदर्भातील संशोधनाकडे न जाता तो कोळशासंबंधित नव्या स्वच्छ (?) तंत्रज्ञानाकडेच जातो आहे. प्रशासनाचा दावा असा आहे की, तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे कोळशातून बाहेर पडणाऱ्या वायूंचे प्रमाण कमी करता येणे शक्य आहे. पण या तंत्रांमधून सल्फर डायॉक्साइड आणि नायट्रोजन - ऑक्साइड या दोनच वायूंचे प्रमाण कमी करता येणे शक्य होत आहे. अमेरिकी काँग्रेसची शाखा असलेल्या 'जनरल अकाउंटिंग ऑफिस' या संशोधनसंस्थेनेदेखील हा तंत्रज्ञानाचा कार्यक्रम निरुपयोगी असून तो ढिसाळरीत्या राबविला जात असल्याचे मत व्यक्त केले आहे.

अशा रीतीने कोळशाच्या काळ्या पैशावर व ऊर्जेवर नजर ठेवून बसण्याच्या अमेरिकेच्या धोरणापायी पृथ्वीचा 'ताप' मात्र वाढतोच आहे !

*(डाउन टू अर्थ-३१ ऑगस्ट २००५)*

(पृष्ठ ३ वरून)
टिळक हे दोघेही समकालीन. परस्परांच्या काव्याचे चाहते आणि एकमेकांचे मित्रही. केशवसुत आणि त्यांची कविता यांच्याबद्दल टिळकांना अपार प्रेम होते. १० फेब्रुवारी १८९५ रोजी टिळकांनी बाप्तिस्मा घेतला त्याच्याच आगेमागे केशवसुतांनाही बायबल वाचण्याचा छंद लागला होता. टिळक हे आधुनिक कवितेच्या युगारंभीचे केशवसुतांचे सहचर तर, मराठी कवितेच्या आधुनिक युगानंतर अवतरलेल्या नवकवितेच्या युगाचे बाळ सीताराम मर्ढेकर हे अध्वर्यू. आधुनिक मराठी कवितेचे प्रणेतेपद केशवसुतांकडे जाते, तर नवकवितेच्या युगाचे मर्ढेकरांकडे. विस्मय वाटावा असा एक योग असा की खान्देशातील ज्या फैजपूर या गावी १९०१ ते १९०४ या कालावधीत मुख्याध्यापक म्हणून केशवसुत काम पाहत होते त्याच फैजपूरमध्ये, केशवसुतांच्या देहावसानानंतर चारच वर्षांनी म्हणजे १९०९ साली, मर्ढेकरांचा जन्म झाला. एकूण काय तर, मध्ययुगातून आधुनिक युगात आणि त्यानंतर नवकवितेच्या युगात झालेल्या मराठी कवितेच्या संक्रमणाचे काही कवडसे गेल्या वर्षभरात या सदराच्या माध्यमातून आपल्याला न्याहाळता आले. केशवसुतांच्या कवितेला लाभलेले काळाचे तसेच तत्कालीन सामाजिक परिस्थितीचे कोंदण आणि त्यातून घडलेले 'केशवसुत' नावाचे 'मन' यांचा वेध घेण्याचा प्रयत्न करणारा 'काल'चे 'आज'साठीमधील लेख म्हणजे या युगप्रवर्तक कवीला केलेले अभिवादन आहे. नवविचारांचे समाजात केवळ सर्जन होऊन भागत नाही. अशा नवविचारांचे स्वागत करण्यास उत्सुक असणाऱ्या समाजघटकांपर्यंत ते पोहोचावे लागतात. त्यासाठी या दोहोंना जोडणारे संवादाचे पूल भक्कम असणे गरजेचे आहे. असे पूल नसतील, अथवा असलेले पूल पुरेशा ताकदीने वापरलेच जात नसतील तर नवविचारांचे भ्रमण आणि त्या भ्रमणाची गती पांगुळते. मग केशवसुत अपेक्षितात ते सारे 'जुने' कसे आणि केव्हा हद्दपार व्हावे? शेतीसंदर्भात गेल्या चार-साडेचार दशकांत आपल्या देशात निर्माण झालेल्या नवज्ञानाचा, आधुनिक तंत्राचा, नवीन माहितीचा विस्तार-प्रसार शेतकऱ्यांच्या शेतांपर्यंत होण्यात आजमितीस नेमकी हीच अडचण येते आहे. या एका निराळ्या आणि तितक्याच रोचक पैलूचा धांडोळा घेणारा लेख अंतर्मुख बनविणारा आहे. अखेर, अर्थबोधपत्रिकेचे आद्य उद्दिष्ट तेच तर आहे.

# 'तुतारिनें ह्या सावध व्हा तर!'

'काव्य करतो तो कवी' ही झाली आपली सुटसुटीत व्याख्या. पण नाही. 'कवी'या शब्दाच्या अर्थाची व्याप्ती चांगली ऐसपैस आहे. 'काव्यकर्ता' हा या शब्दाचा केवळ एक अर्थ. अनेकांतील एक. 'विचारी', 'ज्ञानी', 'ज्ञाता', 'विद्वान', हे 'कवी' या शब्दाचे अन्य अर्थ. त्यातही पुन्हा एक मौज आहे. अर्थांच्या या मालिकेत 'कवि'या मूळ संस्कृत शब्दाचा 'सर्वज्ञ' असा अर्थ कै.जनार्दन विनायक ओक यांनी संपादन केलेल्या 'गीर्वाणलघुकोशा'त सापडतो पहिल्या क्रमांकावर! 'सर्वज्ञ' या शब्दामधून देशकालातीतता सूचित होते. निव्वळ वर्तमानाचाच नाही तर, वाहून गेलेल्या भूतकाळाच्या प्रवाहखुणा निरखत सुदूर भविष्याचाही वेध घेण्याचे सामर्थ्य ज्याच्या ठायी असते, तो 'कवी'.

केशवसुतांना हे मर्म ठाऊक असले पाहिजे. आपल्या 'कवी'असण्याचा जो जाज्ज्वल्य अभिमान त्यांच्या ठायी होता त्याचा तितकाच आक्रमक आविष्कार घडविणाऱ्या 'आम्ही कोण?' या विख्यात कवितेत म्हणूनच-

*दिक्कालांतुनि आरपार अमुची दृष्टी पहाया शके!*

अशा अत्यंत ठणठणीत शब्दांत केशवसुतांनी त्या सामर्थ्याचा उद्‌घोष केला आहे. भूतकाळाचे उचित भान असणे आणि भूतकाळातच मनाने जखडले जाणे या दोन अगदी निराळ्या बाबी आहेत. म्हणूनच,

*जुनें जाउं द्या मरणालागुनि, जाळुनि किंवा पुरुनी टाका,*

अशी गतिमान तुतारी त्यांनी १८९३ साली फुंकली. मात्र, जे जे म्हणून जुने ते ते सगळेच जीर्ण, कालबाह्य आणि म्हणून टाकाऊ नसते, याचा विवेक त्यांच्या ठायी होता. कवी हा इतरेजनांपेक्षा वेगळा असतो. कालसापेक्ष काय आणि कालातीत काय, याचा नीरक्षीरविवेक कवीपाशी असतो. म्हणूनच, लोक फोले पाखडण्यात गुंगले तरी कवीचे ध्यान मात्र परंपरेतील निखळ सत्त्वांशावरच खिळलेले असते, ही केशवसुतांची धारणा आहे. 'आम्ही कोण?' या कवितेमधील-

*फोलें पाखडितां तुम्ही, निवडितों तें सत्त्व आम्ही निकें!*

या ओळीत केशवसुतांनी ती व्यक्तही केली आहे. 'केशवसुत' नावाच्या 'मना'ची ही जणू जीवननिष्ठाच आहे. हे मन कसे आहे, त्याच्या प्रेरणा काय आहेत, त्याच्या संवेदनशीलतेचा पैस केवढा आहे यांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न करणे, हाच केशवसुतांच्या येऊ घातलेल्या स्मृतिशताब्दी दिनी त्यांना अभिवादन करण्याचा सर्वोचित मार्ग ठरावा.

केशवसुत आणि त्यांची कविता हे अव्वल इंग्रजीत महाराष्ट्रात साकारलेल्या आधुनिक युगाचे अपत्य आहे. केशवसुतांचा जन्म १८६६ सालचा म्हणजेच इंग्रजी राजवटीच्या ऐन भरात येऊ घातलेल्या माध्यान्हीच्या अंमळ अलीकडचा. मध्ययुगीन मानसिकतेमधून बाहेर पडून आधुनिक विचारविश्वात प्रवेशणाऱ्या महाराष्ट्रात या काळात जे मन्वंतर घडून आले त्याची अनेक पदचिन्हे केशवसुतांच्या कवितेत उमटलेली आढळून येतात. संपूर्ण मध्ययुगात पूर्णपणे परंपराशरण, धर्मप्रवण आणि केवळ पारलौकिक श्रेयसावरच खिळलेली दृष्टी या मन्वंतरादरम्यान हळूहळू लौकिकाकडे वळून तेथे स्थिरावत होती. इंग्रजी शिक्षण, प्रशासन, अंमल, कायदेकानू यांची बसलेली घडी आणि त्यातून प्रसविणारे नवीन आचारविचार, संस्थाजीवन, मूल्यव्यवस्था यांच्या कोंदणात केशवसुतांची कविता जन्मली आणि वाढली-बहरली. आपण समजतो तेवढे लौकिक जीवन त्याज्य नाही तर त्यातही पाहण्या-अनुभवण्यासारखे खूप काही आहे ही जाणीव; धार्मिक-आध्यात्मिक तसेच सांस्कृतिक विचारविश्वात दिसणारे साचलेपण झटकून टाकण्यासाठी कंबर कसण्याची निकड; समाजातील मानवनिर्मित कप्पे, वर्ण-वर्ग-वंश-जातिभेद यांचे काचणारे बंध तोडून स्वातंत्र्य-समता-बंधुता या प्रगत मानवीमूल्यांचा अंगिकार करण्याकडे नवशिक्षितांचा वाढता असणारा कल अशा साऱ्या भावभावनांचे पडसाद 'केशवसुत' नावाच्या 'मना'वर उमटत होते. प्रेम, निसर्ग, समाजस्थिती, सुधारणा, शिक्षणपध्दती, जीवनमूल्ये, उद्योगप्रियता, जग बदलण्याचा ध्यास, विश्वात्मकतेची आस हे केशवसुतांच्या रचनांत आढळून येणारे काव्यविषय ही सारी त्या नवसंस्कारित 'मना'ची स्पंदने आहेत.

हे संक्रमण अधांतरी नव्हते. संत-पंत आणि तंत अशा तीन परंपरांचे चांगले पाच शतकांचे संचित केशवसुतकालीन मराठी काव्यविश्वाच्या पाठीशी उभे होते. परंपरेच्या या संचिताशी केशवसुतांची असणारी जवळीक त्यांच्या कवितांत अनेक ठिकाणी अनुभवास येते. परंतु, त्यातही पुन्हा एक मजा आहे. वामन-मोरोपंतादी पंतपरंपरेच्या, केशवसुतांच्या रचनांमधील पाउलखुणा या संस्कृतोद्भव शब्दांच्या रेलचेलीद्वारे तसेच काही कवितांच्या रचना-घाटांद्वारे दृग्गोचर होतात. तर, महाराष्ट्रीय संतमंडळाने

परमार्थाच्या क्षेत्रात दिलेल्या समतेच्या हाळीचे, निरर्थक कर्मकांडांच्या बडिवाराचे झेंडे नाचविणाऱ्या दांभिक धर्माचाराच्या विरोधात थोपटलेल्या दंडाचे प्रतिध्वनी 'झपूर्झा', 'स्फूर्ति', 'नवा शिपाई', 'गोफण केली छान' यांसारख्या कवितांमध्ये शब्दबद्ध झालेल्या केशवसुतांच्या उत्कट उर्मीमध्ये स्पष्टपणे ऐकू येतात. तसे पाहिले तर हे स्वाभाविकही आहे. कारण, निळोबा पिंपरनेरकरांच्या रूपाने वारकरी संतपरंपरेतील काव्यनिर्मिती १७५३ सालापर्यंत, तर मोरोपंतांच्या माध्यमातून पंतपरंपरेतील काव्यरचना १७९४ सालापर्यंत मराठीमध्ये जितीजागती होतीच. मात्र, काळाच्या दृष्टीने सर्वाधिक निकट असणाऱ्या तंतकवींच्या पडछाया केशवसुतांच्या रचनेत त्यामानाने मग अभावानेच दिसतात. पेशवाई बुडल्यानंतर ४८ वर्षांनीच केशवसुतांचा जन्म झाला. संपूर्ण उत्तर पेशवाईतील लोकसंस्कृतीवर मुद्रा उठविली ती शाहिरांनी. सगनभाऊ - प्रभाकर - परशुराम या त्रिमूर्तीच्या रूपाने ही तंतपरंपरा १८४०च्या दशकापर्यंत गर्जत-गाजत होती. प्रभाकर आणि परशुराम तर अनुक्रमे १८४३ आणि १८४४ सालापर्यंत हयात होते. म्हणजे, १८८५ साली केशवसुतांच्या कविता प्रसिद्ध होऊ लागल्या तेव्हा शाहिरी युग मागे पडून जेमतेम चार दशके उलटत होती. परंतु केशवसुतांच्या कवितेत या परंपरेच्या संचिताचे कण मात्र तितकेसे प्रकर्षाने आढळत नाहीत. मात्र, केशवसुतांच्या रचनांत तसे कण अजिबातच सापडत नाहीत, असेही म्हणवत नाही. कारण, शाहिरी वाणीचे काही विशेष केशवसुतांच्या एका अतिशय गाजलेल्या कवितेत आढळून येत असल्याचे निरीक्षण कविवर्य विंदा करंदीकर यांनी नोंदविले आहे. 'तुतारी' ही ती कविता. विंदांच्या विश्लेषणानुसार, 'तुतारी' या कवितेतील 'केशवसुती वाणीचे खडे बोल, तिचा प्रपाती ओघ, तिचा वज्राघाती उच्चार हे संतापेक्षा शाहिराशीच जवळीक करणारे आहेत.' केवळ इतकेच नाही तर, 'तुतारी' ही केशवसुतांची कविता विंदांना 'भूताऐवजी भविष्यातून प्रेरणा घेणारा पवाडा' म्हणून भावते, हे या संदर्भात अतिशय मनोज्ञ आहे.

संत, पंत आणि तंत अशा तीनही परंपरांचे संचित पाठीशी असले तरी केशवसुतांची कविता परंपराशरणता, पूर्वगौरववाद अथवा दुसऱ्या टोकास जाऊन परंपरेचा पूर्ण धिक्कार यापैकी कशातच गुरफटलेली दिसत नाही. तिचा धागा तत्कालीन वर्तमानाशी अतिशय बळकटपणे जोडलेला आहे. केशवसुतांची कविता वर्तमानसन्मुख आणि तत्कालीन समाजस्थितीप्रती संवेदनशील राहण्यास केशवसुतांवर झालेला सुधारकांचा परिणाम कारणभूत ठरला असावा, अशी अटकळ बांधण्यास या ठिकाणी पुरेशी जागा आहे. 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' आणि 'मजुरावर उपासमारीची पाळी'

यांसारख्या केशवसुतांच्या कविता या दृष्टीने लक्षणीय ठरतात. १८८४ ते १८८९ ही पाच वर्षे केशवसुत शिक्षणानिमित्त पुण्यात होते. केशवसुत पुण्यास आले तेव्हा ते १८ वर्षांचे होते. केशवसुतांचे अत्यंत संवेदनशील असे कविमन आणि तितकेच संस्कारक्षम वय, तारुण्याच्या पाउलखुणांबरोबर येणारा अदम्य उत्साह व भवतालचे जग आरपार बदलून टाकण्याची जबर ऊर्मी आणि राजकीय, सामाजिक तसेच शैक्षणिक चळवळींनी घुसळून निघालेले तत्कालीन पुणे अशा बेलाग संयोगातून त्या काळात फुललेली केशवसुतांची कविता कोणत्या प्रेरणांच्या मुशीतून साकारली असेल, याची कल्पनाही पुरेशी बोलकी आहे.

विशेषतः, 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न', आणि 'मजुरावर उपासमारीची पाळी', या दोन कवितांचा रचनाकाळ या संदर्भात महत्त्वाचा ठरतो. यातील पहिली आहे ३ सप्टेंबर १८८८ रोजी रचलेली, तर दुसरी आहे १८८९च्या जानेवारी महिन्यातील. शिवाशिव आणि विटाळाचे भूत डोक्यावर स्वार झालेला एक ब्राह्मण रस्त्यावर मजेने खेळणाऱ्या अंत्यजांच्या मुलांना दूर पिटाळतो, ही 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' या कवितेतील मध्यवर्ती घटना. बावरलेली मुले त्या दटावणीने घरी पळतात. मात्र, घाबरून दूर न पळता रस्त्यावरच, परंतु जरासे बाजूला सरकून उभ्या राहिलेल्या त्यांपैकीच एका मुलावर तो ब्रह्मकुलोत्पन्न, 'सावली अंगावर पडेल, दूर हो' म्हणून पुढे आणखी खेकसतो तेव्हा त्या मुलाच्या मनात उफाळलेले विचारांचे आवर्त शब्दबद्ध करताना या कवितेत केशवसुत म्हणतात-

*तधीं बाळ तोही घराला निघाला,*
*मनीं आपुल्या या करी चिन्तनाला:-*
*"जरी त्यावरी सांवली माझि गेली,*
*तरी काय बाधा असे ठेविलेली ?"*

समाजातील पददलित घटकांमध्ये जे संघर्षशील आत्मभान १९व्या शतकाच्या अखेरीस जागृत होऊ लागले होते त्याचा अतिशय नेमका आणि तितकाच प्रातिनिधिक आविष्कार केशवसुतांच्या या रचनेत आढळतो. ही कविता आहे १८८८ सालातील. ब्राह्मण्याच्या अहंगंडाने ग्रस्त बनलेल्या धर्ममार्तंडांनी माजविलेल्या दांभिक धर्माचाराच्या गारुडातून पददलित समाजघटकांना बाहेर काढण्यासाठी महात्मा जोतीराव फुले यांनी पुण्यात उभारलेल्या आक्रमक चळवळीची जवळपास ४० वर्षांची पार्श्वभूमी या कवितेला लाभलेली आहे. अस्पृश्य समजल्या गेलेल्या समाजघटकांमधील मुलांसाठी जोतीरावांनी

सुरू केलेली शाळा, 'तृतीयरत्न' हे नाटक आणि 'ब्राह्मणाचे कसब', 'गुलामगिरी' यांसारख्या त्यांच्या रसरशीत लेखनकृती, अस्पृश्यांमधील झुंजार जागृतीस संघटित स्वरूप देण्यासाठी २४ सप्टेंबर १८७३ रोजी जोतीरावांनी केलेली 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना या साऱ्या घटना १८८८ सालापूर्वीच्या आहेत. 'अस्पृश्य' अशी हेटाळणी होऊन हजारो वर्षांच्या उपेक्षेचेच वाण पदरात पडलेल्या समाजघटकांमध्ये, जोतीरावांच्या या साऱ्या धडपडीमुळे बिंबत असलेल्या लढाऊ बाण्याचे दर्शन 'केवळ सांवली अंगावर पडली तर ती काय बाधते का?' या 'त्या' मुलाच्या मनात उमटलेल्या 'पहिल्या प्रश्ना'द्वारे घडते. १८८४ ते १८८९ यादरम्यान केशवसुत पुण्यात होते हे वास्तव ध्यानात घेता, पददलित समाजघटकांमध्ये जागृत होत असलेल्या आत्मभानास आणि त्यामधून निपजणाऱ्या असंतोषास काव्यविषय बनविणाऱ्या केशवसुतांचा तत्कालीन महाराष्ट्रातील फुले-आगरकरप्रणीत सामाजिक सुधारणांच्या लढ्याशी जो भावनिक तसेच वैचारिक अनुबंध जुळला होता त्याचीही प्रचिती या कवितेवरून येते.

तीच बाब 'मजुरावर उपासमारीची पाळी' या काव्यकृतीची. कामाच्या शोधात संपूर्ण दिवस वणवण फिरूनही रोजगार न मिळालेल्या एका निराश, दु:खी मजुराची व्याकूळ मन:स्थिती केशवसुतांनी या कवितेत रेखाटली आहे. आपले वडील आपल्यासाठी काही तरी खाऊ घेऊन आता घरी येतील, ही आपल्या कच्च्याबच्च्यांची अपेक्षा आपण जर पुरी करू शकत नसू तर आपले तोंड तरी त्यांना कसे दाखवावे, अशा अतीव निराशेने घेरलेल्या मन:स्थितीत तो मजूर एका श्रीमंताच्या घरासमोर येऊन उभा ठाकतो. त्या उत्तुंग प्रासादाकडे पाहताना त्या मजूराच्या मनात जे विचार उचंबळून येतात त्यांना शब्दरूप देताना केशवसुत लिहितात-

*साऱ्या दिनीं आजचिया नसे मुळीं*
*हातास माझ्या कवडीहि लाभली;*
*पोटा, करोनी मजुरीस मी भरीं;*
*कोणीं दिलें आज न काम हो परी!*

*ही मन्दिरें हो खुलतात चांगली;*
*माझ्या वडीलींच न काय बांधिलीं?*
*मी मात्र हो आज मरें भुकेमुळें;*
*श्रीमंत हे नाचति मन्दिरीं भले!*

केशवसुतांची ही कविता आहे १८८९ सालच्या जानेवारी महिन्यातील. भारतातील कामगार चळवळीचे आद्य प्रणेते नारायण मेघाजी लोखंडे यांच्या प्रेरणेने साकारलेली मुंबईतील गिरणी कामगारांची चळवळ सुरू होऊन तोवर पाच वर्षे उलटली होती. गिरणी कामगारांना हक्काची अशी एक साप्ताहिक सुटी मिळावयास हवी, ही मागणी रेटण्यापर्यंत १८८४ते १८८८-८९ या कालावधीत ही चळवळ पुढे सरकली होती. परिणामी, हळूहळू संघटित होत असलेल्या 'गिरणी कामगार'या श्रमिकांच्या एका मोठ्या घटकाच्या मूलभूत समस्यांकडे समाजातील सुबुद्ध वर्गांचे लक्ष वेधले गेले होते. मात्र, हातावर पोट असणारा कामगार, दैनंदिन रोजंदारीवर खपणारा मजूर हे असंघटित कष्टकरी घटक त्या चळवळीच्या कक्षेत अजून यावयाचे होते. 'मजुरावर उपासमारीची पाळी' या कवितेच्या माध्यमातून नेमक्या याच वर्गाच्या वेदनांना वाट करून द्यावी असे स्फुरण केशवसुतांना व्हावे, हा तत्कालीन नवशिक्षितांमध्ये अशा असंघटित कष्टकऱ्यांप्रती जाग्या होत असलेल्या संवेदनशीलतेचा हुंकार मानता येईल.

अशी ही केशवसुतांची कविता. त्यांनीच प्रतिपादन केल्याप्रमाणे 'दिक्कालातून आरपार' जाणारी. केशवसुतांनी २८ मार्च १८९३ रोजी 'स्वप्राणानें' फुंकलेल्या 'तुतारी'चे आवाहन आजही अप्रस्तुत अथवा कालबाह्य झालेले नाही. दलितांवरील अत्याचारांमध्ये कोठेही खंड नाही. मंदिरप्रवेशास बंदी, सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरण्यास मज्जाव, दलितांची घरे जाळणे यांसारख्या घटना आजही सुखेनैव घडतच आहेत. समाजातील असंघटित कष्टकऱ्यांच्या दुरवस्थेत तसेच हतबलतेत भरच पडताना दिसते. आता तर जागतिकीकरणाच्या लाटेत लपेटल्या जाणाऱ्या आजच्या औद्योगिक वास्तवात एकूणच कामगार चळवळीतील लढाऊ , संघर्षशील बाणा मंदावत आहे. धर्माचे अवडम्बर संघटितपणे वाढविले जात आहे. केशवसुतांना अभिप्रेत असलेला 'नवा शिपाई' समाजात कोठे तरी एकटादुकटाच लढताना दिसतो. त्यांच्या फौजा मात्र आढळत नाहीत. ज्या आत्मसंतुष्टतेचा केशवसुतांना कमालीचा तिटकारा होता तीच आत्मसंतुष्टता आजची जनमान्य 'लाइफ स्टाइल' म्हणून प्रस्थापित होते आहे. या दुरितांविरुद्ध पुकारावयाच्या युद्धाचे रणवाद्य म्हणूनच केशवसुतांनी 'एक तुतारी द्या मज आणूनि' अशा शब्दांत तत्कालीन समाजातील सदसद्‌विवेकास साद घातली होती. आज तोच लढा पुढे नेण्यासाठी तशीच तुतारी केशवसुतांकडेच मागावी लागणार आहे..... त्यांचेच शब्द उसने घेऊन - 'एक तुतारी द्या तर सत्वर'.

*(संदर्भ:- समग्र केशवसुत- संपादक: प्रा. भ. श्री. पंडित )*

# आपली स्वप्नं पूर्ण करा !

- गृह कर्ज
- आधार स्कीम
- ग्राहकोपयोगी कर्ज
- किसान क्रेडिट कार्ड
- शैक्षणिक कर्ज
- रिकरिंग डिपॉझिट स्कीम

अवघ्या कुटुंबाची....
अवघ्या समाजाची
बांधिलकी जपणारी...
महाबँक



New Horizon '04

**बँक ऑफ महाराष्ट्र**

'लोकमंगल', 1501, शिवाजीनगर, पुणे-411 005.
www.maharashtrabank.com


## अर्थबोधपत्रिका वर्गणीदारांसाठी विशेष योजना

(१५ ऑक्टोबर २००४ पासून)

| | |
|---|---|
| वार्षिक वर्गणी | फक्त १०० / - रुपये |
| द्वैवार्षिक वर्गणी | फक्त १८० / - रुपये |
| त्रैवार्षिक वर्गणी | फक्त २६० / - रुपये व एक पुस्तिका भेट |
| पंचवार्षिक वर्गणी | फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट |

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न, लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत तीस रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण, (इंग्रजी पुस्तिका) लेखक - जयकुमार अनगोळ (किंमत तीस रुपये) (३) सक्तीचे प्राथमिक शिक्षण, (मराठी पुस्तिका) लेखक - जयकुमार अनगोळ, अनुवाद - प्रा. रमेश पानसे (किंमत तीस रुपये) (४) शोध घेते ते शिक्षण, लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत - पन्नास रुपये) (५) अर्थबोधपत्रिकेचा मेंदूसंशोधन विशेषांक (फेब्रुवारी - मार्च २००५) - (किंमत चाळीस रुपये)

# ग्रंथालयातील नवी पुस्तके

The End of Poverty - How We Can Make It Happen In Our Lifetime -Jeffrey Sachs; Published by Penguin Books - pp- 396, Price Rs : 394/-

इतिहासात प्रथमच, आपल्या पिढीला जगातल्या हताश झालेल्या राष्ट्रांमधील कमालीचे दारिद्रय संपविण्याची संधी मिळाली आहे. पण जवळजवळ एक अब्ज लोकांना अनारोग्य, कर्जबाजारीपणा व दुर्दैव यांत अडकवून टाकणारे दुष्टचक्र आपण कसे भेदणार? संयुक्त राष्ट्रांचे महासचिव कोफी अन्नान यांचे विशेष सल्लागार व जगातले एक अग्रगण्य अर्थतज्ज्ञ जेफरी सॅक्स यांच्याजवळ त्याचे उत्तर आहे. जगातल्या सुमारे १०० राष्ट्रांमधील नेत्यांना आर्थिक विकास व दारिद्रय निवारणाच्या संदर्भात मौलिक सल्ला देण्याचे काम त्यांनी केले आहे. दारिद्रय निर्मूलन वास्तवात उतरविण्याच्या पायऱ्या कोणत्या आहेत, ते अल्पतम खर्चात कसे करता येऊ शकेल, याचे मार्गदर्शन या पुस्तकात त्यांनी केले आहे. सॅक्स यांच्यासारख्या अर्थतज्ज्ञाने केलेले पथदर्शक विवेचन म्हणजे केवळ कल्पनाविलास नसून ते अतिशय व्यावहारिक असल्याचे पुस्तकाच्या अंतरंगातून जाणवते.

---

Power, Politics and Rural Development-Essays on India, by-G.K.Lieten; Publishers- Manohar; - pp- 284, Price Rs : 575/-

पंधरा वर्षांच्या सामाजिक आणि मानववंशशास्त्रीय सखोल संशोधनाचे फलित म्हणजे प्रस्तुत पुस्तक. भारतातल्या काही खेडेगावांमधल्या नागरिकांच्या दैनंदिन जीवनाचे प्रतिबिंब यात पडलेले दिसते. पुस्तकाच्या अनुक्रमणिकेवर एक साधा कटाक्ष टाकला तरी विषयांची विविधता तर जाणवतेच, पण त्यांचे महत्त्व आणि निर्णयप्रक्रियेशी असलेला त्यांचा संबंधही जाणवतो. उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगालमधल्या ग्रामपंचायती, जमीन-सुधारणांचे विकासावरील परिणाम, केरळमध्ये घडून आलेल्या मोठ्या मानवी विकासाची कारणे, गावपातळीवरचा जमातवाद, विकासाच्या संदर्भातील गरीब ग्रामस्थांचे दृष्टिकोण, बालमजूरी, 'एक संपत्ती' अशा दृष्टिकोणातून मुलांकडे पाहण्याची कुटुंबांची प्रवृत्ती- अशा अनेक विषयांचा अंतर्भाव यात आहे. अर्थात, असे करताना ग्रामस्थांनी व्यक्त केलेले दृष्टिकोण आणि त्यांच्या दैनंदिन जिव्हाळ्याच्या बाबी हेच प्रमुख पुरावे राहतील, याची काळजी लेखकाने घेतली आहे.

■■

RNI, Regn.No. MAHMAR/2002/9806
Declaration Ref. P.H.M./S.R./180/VIII/2005
Postal Regn.No.PR/RNP/PNW/M/231/2003-2006
L.W.P. LICENCE NO. L-502

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग - व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य / पत्रके / पुस्तिका योग्य नमुन्यांत तयार करून प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**- संस्थेचे नियंत्रण मंडळ -**

•अजित कर्णिक •विकास चित्रे •कुमुदिनी दांडेकर
•ललित देशपांडे •द.ना. धनागरे •आनंद नाडकर्णी •रमेश पानसे
•मनोहर भिडे •नीळकंठ रथ •व्ही.एम्.राव •ए.वैद्यनाथन
•सत्यरंजन साठे •रामदास होनावर •योगेंद्र यादव

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**